# पद भाग क्र.८

२९ :– ध्रिग ध्रिगता को अंग
३० :– प्रश्न उत्तर को अंग
३१ :– कर्मी नर को अंग
३२ :– सेन को अंग
३३ :– बिन त्यागी को अंग
३४ :– ममता को अंग
३५ :– कलयुग निषेध को अंग
३६ :– त्यागी फकिरी के लक्षण को अंग
३७ :– निच जाती निषेध को अंग
३८ :– अंतकाल की विधी का अंग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांड्क यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✼ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समझन्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

| अ.नं. | पद | पेज नं. |
|---|---|---|

पद भाग क्र.८

२९ :– ध्रिग ध्रिगता को अंग
३० :– प्रश्न उत्तर को अंग
३१ :– कर्मी नर को अंग
३२ :– सेन को अंग
३३ :– बिन त्यागी को अंग
३४ :– ममता को अंग
३५ :– कलयुग निषेध को अंग
३६ :– त्यागी फकिरी के लक्षण को अंग
३७ :– निच जाती निषेध को अंग
३८ :– अंतकाल की विधी का अंग

२९ :– ध्रिग ध्रिगता को अंग

| | | |
|---|---|---|
| १ | ध्रिग ध्रिग सो नर नार क्वायी १११ | १ |
| २ | संतो इन मन कूं क्या कीजे ३५८ | १ |

३० :– प्रश्न उत्तर को अंग

| | | |
|---|---|---|
| १ | घट मांहि साहेब बसे हो १२५ | ३ |
| २ | हर को सोझो या तन मांही १४४ | ४ |
| ३ | जंवरो सोज कहो घट मां ही १६८ | ५ |
| ४ | जी गुराँ भेद बताव ज्यो १७२ | ५ |
| ५ | खण्ड पिण्ड की गत अेक है २०१ | ६ |
| ६ | कोन शब्द से कोन होय २०७ | ७ |
| ७ | मै देता हुँ हेला जुग के माय २१३ | ८ |

| | | |
|---|---|---|
| ८ | ने:हचल को रंग डोल कहुँ हो २५१ | ९ |
| ९ | राजा अेसा भेष हमारा २९२ | १० |
| | ३१ :– कर्मी नर को अंग | |
| १ | साधो भाई करड्डु प्रतन सिजे ३१३ | १२ |
| | ३२ :– सेन को अंग | |
| १ | बिण धावण लाहो जे गाळे ८७ | १३ |
| २ | संतो बाद करे झूठा ३३९ | १३ |
| ३ | संतो राम उथापे झूठा ३६८ | १५ |
| | ३३ :– बिन त्यागी को अंग | |
| १ | साधो भाई तन धर त्यागी नाहि ३१७ | १७ |
| २ | त्यागी ओ तुं भेद बिचारे ४०७ | १८ |
| | ३४ :– ममता को अंग | |
| १ | अेसा जुग मे को नही २२ | १९ |
| २ | वा कल तो पावे नही ४१७ | २० |
| | ३५ :– कलयुग निषेध को अंग | |
| १ | कळ जुग पूरण जोय १९१ | २१ |
| २ | संतो सुणो भेष भूलो जाय ३७१ | २३ |
| ३ | सुणज्यो बाबा कळजुग बरत्यो आय ३८७ | २५ |
| ४ | सुणो सिष अेसा कळ जुग आसी ३९२ | २६ |
| | ३६ :– त्यागी फकिरी के लक्षण को अंग | |
| १ | जुग माही सोई फकीर बखाण १८४ | २७ |
| २ | साधो भाई त्याग दिया हम सोई ३२० | २८ |
| | ३७ :– निच जाती निषेध को अंग | |

| | | |
|---|---|---|
| १ | बाँभीडा खीज कांय दुख पायो१ २८ | २९ |
| २ | बाँभीडा खीज कांय दुख पायो२ २९ | ३० |
| | ३८ :– अंतकाल की विधी का अंग | |
| १ | आन ध्रम दिन चार ०४ | ३१ |
| २ | चालोनी रे हंसा ९१ | ३४ |
| ३ | धर मानव अवतार ९९ | ३६ |
| ४ | धिन्न धिन्न सो हंस भाग १०३ | ३८ |
| ५ | धिन धिन सो हंस जीव १०४ | ३९ |
| ६ | जाग जाग घर जाग १६० | ४० |
| ७ | संतो भाई सुणज्यो भेद बिचारा ३४८ | ४१ |
| ८ | सुच्च धरणी अप सुच्च ३८१ | ४३ |
| ९ | सुणज्यो सब नर नार ३८८ | ४४ |

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

१११

।। पदराग बसन्त ।।

**ध्रिग ध्रिग सो नर नार क्वायी**

**ध्रिग ध्रिग सो नर नार क्वायी ।। हर पंथ छाड़ जम गेल जोय ।।टेर।।**

जे रामजीच्या देशात जाण्याचा रस्ता सोडून काळाच्या रस्त्याने चालत आहे.त्या स्त्री-पुरुषांचा धिक्कार आहे.।।टेर।।

**जन संग छाड ठग संग कीन ।। लाडूज तज मुख भिष्ट लीन ।।**

**नर अमर बेल कूं खिणे आय ।। जळ तुस बेल कूं पावे हे जाय ।।१।।**

सावकार संगत सोडतो व ठगांची संगत करतो.लाडू बर्फीचे भोजन सोडतो व बुध्दी भ्रष्ट करणाऱ्या मांस,मासे भक्षण करतो.अमर जडीला खोदून फेकून देतो व विषारी जड्या जमा करतो.असेच हे मुर्ख लोक रामजीच्या देशात पोहचविणारी रामजीची भक्ती सोडतात. ।।१।।

**प्रण्यो पीव पर हऱ्यो संग ।। निच यार संग रची रंग ।।**

**गज से उत्तर चढ्यो खर आय ।। इमरत छाड बिषे मथ खाय ।।२।।**

भेरु,भोपा,मोगा,पितर,इत्यादीची काळाच्या देशात घेऊन जाणारी भक्ती खुशीने धारण करतांना विवाहबध्द पती सोडून व्यभीचारी पुरुषाचा संग करतात.हत्तीवरुन उतरुन गाढवावर स्वार होतात.रामनाम अमृत त्यागतात व विषयरस करुन पितात असेच भक्ती करणारे रामजीची भक्ती त्यागतात व रामजी सोडून अन्य देवतांची भक्ती धावून धावून करतात.।।२।।

**सांच छाड गहे झूठ कोय ।। धन गाँठ भव ज्या हो रहे सोय ।।**

**जन केत देव सुखदेव आण ।। फिट शुभ छाड गहे असुभ जाण ।।३।।**

संतांचे सतज्ञान त्यागतात व काळाच्या लोकात पोहचविणारी देवी देवतांची खोटी भक्ती धारण करतात.खिश्यात धन आहे व जेथे चोरांचे भय आहे.तेथे निश्चित होऊन गाढ झोप घेतो म्हणजे शरीरात अमोलक श्वास आहे व जेथे काळाचे भय आहे.अशा ममतेच्या गाढ झोपेत झोपतो म्हणजे रामजीच्या देशात पोहचविणारे रामनाम घेण्याचा शुभ रस्ता त्यागतो व काळाच्या देशात पोहचविणारा अन्य देवतांचे नाम जपतो.अशा सर्व स्त्री-पुरुषांना धिक्कार आहे धिक्कार आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।४।।

३५८

।। पदराग बिहगडो ।।

**संतो इण मन कूं क्या कीजे**

**इम्रत नाव छोड दे दूष्टी ।। बिषे करम सूं रीजे ।।टेर।।**

जीवाच्या सोबत मन ही विकारी माया आदि अनादि पासूनच आहे.हे मन जीवाच्या सोबत नंतर कधी तरी जुडले असेल हे विचार करणे खोटे आहे.हे मन पाच विषयाच्या सुखात लिन राहते.मनाच्या या प्रकृतीच्या कारणाने जीव नर्क तसेच चौऱ्यांशी लक्ष योनीत जावून पडतो तरीही मन विषय वासनात पूर्ण लिपायमान राहतो आणि जीवाला ही दु:ख भोगवत राहतो. अशा मनापासून सुटका करण्यासाठी ज्या ज्या संतांनी मन मारले अशा संताला जीव विचारतो की या दुष्ट मनाचे मी काय उपाय करु?हे आदि अनादिपासून माझ्या सोबत आहे.ते माझ्यापासून वेगळेही करु शकत नाही.हे माझे मन इतके दुष्ट आहे की ज्या अमृतरुपी नामाने माझे नर्ककुंड सुटू शकतो ते नाव त्यागून देतो व ज्या विषय वासनाच्या कर्माने अती दु:खाच्या नरकाकुंडात जावून पडतो.अशा विषय वासनांच्या कर्मांना खुश होवून होवून जावून जावून चिपकतो.।।टेर।।

हे सो काम करे नही कोई ।। नही हे तांसूं झूंबे ।।
धिग धिग मन बुध बिहुणा ।। आन झूट सूं लूंबै ।।१।।

नर्ककुंडात न पडण्याचे कारज तर करत नाही म्हणजे अमृतरुपी नाव तर घेत नाही व नर्ककुंडात पडणारे विषय कर्मांशी जावून जावून झोंबतो.या कारणाने अशा माझ्या मनाला धिक्कार आहे,धिक्कार आहे.हे माझे मन बुध्दीहीन आहे.अमृतनाव म्हणजे परमात्म्याचे नाव त्यागून ज्याच्याने विषय कर्म झोंबतात असे अन्य खोटे भेरु,भोपा,मोगा,पितर, सितला,दुर्गा,पीर,क्षेत्रपाल,गोगा इ.देवतांशी झोंबतो.।।१।।

अलवी जीभ झके दिन राती ।। नेण पाप दिस जोवे ।।
मात पिता सुत नार कुलंतर ।। धन काजे नित रोवे ।।२।।

हे मन साहेबाने दिलेल्या जीभेला विषय विकाराच्या गोष्टीत लावतो.असेच साहेबने दिलेल्या नयनांना विषय पापांकडे घेरतो.हे माझे मन साहेब सोडून माता,वडिल,मुलगा तसेच परीवार या सोबत न चालणाऱ्या खोट्या मायेसाठी व धनासाठी नेहमी रडतो. ।।२।।

लालच लोभ क्रम के काजा ।। नित मन पंथ धावे ।।
हर की भक्त जन की मन मे ।। सपने हुं नहि लावे ।।३।।

हे माझे मन ज्याच्याने नर्कात जावे लागेल असे लालुच लोभाचे विकारी कर्म नेहमी जोर लावून करतो.ज्याच्याने नर्क सदाकरीता सुटेल अशी हरची भक्ती व संतांच्या संगतीच्या गोष्टी स्वप्नातही जवळ येवू देत नाही. ।।३।।

ज्या सूं जाय नर्क मे पडीये ।। सो बिध हरखर धारे ।।
तां पद सूं मत मोख मिलीजे ।। वां कूं नाय संभारे ।।४।।

ज्या ज्या विध्यांनी जीव नर्कात जावून पडेल त्या सर्व विध्या हर्षायमान होवून खुशीने

धारण करतो व ज्या ज्या विध्यांनी नर्क सदाकरीता सुटेल.अशा मोक्ष पदाची विधी सांभाळीत नाही. ।।४।।

हा हा चार चल्यो इण मन सूं ।। मेरे हात न आवे ।।
के सुखराम मोख पद छाड्र ।। नरक कुंड दिस धावे ।।५।।

अशा माझ्या दुष्ट मनाने मी वारंवार हारुन जावून राहिलो आहे.माझ्या सर्व प्रयत्ना नंतरही हे मन माझ्या हातात येत नाही.हे माझे दुष्ट मन महासुखाचे मोक्षपद सोडून महादु:खाच्या नर्ककुंडाकडे धावते असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात. ।।५।।

१२५

।। पदराग धमाल ।।

घट मांहि साहेब बसे हो
घट मांहि साहेब बसे हो ।। तम सुणज्यो सब जन लोय ।।टेर।।

जे जे ब्रम्हांडात आहे ते सर्व पिंडात म्हणजे घटात आहे.असेच साहेब ब्रम्हांडात आहे तर घटातही आहे.हे तुम्ही सर्व संत ऐका.।।टेर।।

बंदो कहावे सो मन जाणो ।। निजमन करता होय ।।
रमता राम तिको इण घट मे ।। सोऊँ सांस कूं जोय ।।१।।

तसे ही शरीरात बंदा हे मन आहे.करता हे निजमन आहे.रमता राम हे सोहम श्वास आहे. ।।१।।

अंजण होय तके तत्त इंद्रियाँ ।। सोऊँ निरंजण जाण ।।
रंरकार धुन पारब्रम्ह हे ।। अवगत अनाद बखाण ।।२।।

ब्रम्हांडात पाच तत्व आकाश,वायु,अग्नी,जल,पृथ्वी आहे.तर देहात कान,चामडी (कातडी) डोळे,जिभ,नाक हे इंद्रिय आहेत.ब्रम्हंडात निरंजन आहे.तर घटात(शरीरात)सोहम हे निरंजन आहे.ब्रम्हंडात अविगत म्हणजे अनाद हा पारब्रम्ह आहे तर घटात रंरकार धुन हे पारब्रम्ह आहे.।।२।।

धुन अनाद शब्द सुर जिंग हे ।। अे सुण ग्रभ न जाय ।।
अजरावण सो अमर पुरष हे ।। सो घट धुन कहाय ।।३।।

ब्रम्हंडात अनाद हा अजरावण अमर पुरुष आहे तर घटात जिंग ध्वनी आहे.अनाद हा जीवब्रम्ह सारखा गर्भात येत नाही. ।।३।।

हद सो नाभ नास का बीचे ।। बेहद त्रिगुटी पार ।।
तीन लोक अे सीस नाभ हे ।। पग सो पाव बिचार ।।४।।

जसे ब्रम्हंडात अनाद स्वर्ग,मृत्यूलोक,पाताळलोक आहे.तसे बंकनाळपासून डोक्यापर्यंत स्वर्ग लोक आहे.नाभीमध्ये मृत्यूलोक आहे.पायाच्या तळव्यापर्यंत पाताळलोक आहे.

असे ब्रम्हांडात आहे ते पिंडात आहे. ।।४।।

पाँचू तत्त इन्द्रियाँ काय ।। नारायण जिंग राम ।।
ओ सुण भेद लखेगा घट मे ।। ताका सझे सब काम ।।५।।

आकाश,वायु,अग्नी,जल पृथ्वीपासून पाच तत्व शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध या इंद्रियांची काया एकच व घटातील नारायण म्हणजे हंस(जीव)व जींग राम एकच आहे.असे ब्रम्हंड व पिंड एकच असे समजून ब्रम्हांडात जसा अविगत आहे तसा घटात अविगत आहे.हे ज्याला ज्ञान होईल त्याचे सर्व काम पूर्ण होईल. ।।५।।

खंड पिंड का निरणा सब सुणज्यो ।। हे अेसी बिध मांय ।।
क्हे सुखराम अवगत हर चहिये ।। तो सतगुरू कीज्यो आय ।।६।।

आदि सतगरु सुखरामजी महाराज सांगतात की,खंड पिंडाचा सर्व निर्णय ऐकून अविगत हर ज्याला हवा त्याने येऊन मला सतगुरु धारण करा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।६।।

१४४

।। पदराग धमाल ।।

हर को सोझो या तन मांही

हर को सोझो या तन मांही ।। खंड पिंड की बिध अेक हे हो ।।टेर।।

हरला याच पिंडात शोधा.पिंड व खंड ब्रम्हंड्ची रचना एकसारखी आहे.।।टेर।।

बंदो कवन कवन सो करता ।। कवन राम सो क्काय ।।
अवगत किसा कहो इण घट मे ।। सो मुझ देवो बताय ।।१।।

शरीरात बंदा कोण आहे?शरीरात कर्ता कोण आहे?शरीरात(शरीराच्या आत)३ राम कोण आहे व शरीरात अविगत कोण आहे हे मला सांगा.।।१।।

अंजन कवन निरंजन कोहे ।। पारब्रम्ह कहो मोय ।।
आवागवन ग्रभ नहि आवे ।। तिन को काहा घट होय ।।२।।

शरीरात अंजन म्हणजे इंद्रियांचे देव कोण आहे,निरंजन पारब्रम्ह कोण आहे व आवागमनात, गर्भात येत नाही तो निरंजन सतस्वरुप घटात कोठे राहतो?।।२।।

बेहद किसी हद सो क्या हे ।। तीन लोक कहो जाण ।।
पाचूँ तत्त छटां नारायण ।। सोज पिंड कोहो आण ।।३।।

या शरीरात बेहद कोठे आहे,हद कोठे आहे?हे पाच तत्व तसेच सहाव्वा नारायण कोठे आहे ते शोधून सांगा.।।३।।

खण्ड पिण्ड को निरणो कीजे ।। कोहो ठाकुर कुण होय ।।
कहे सुखराम ग्यान बिन सुळज्या ।। राम न पायो कोय ।।४।।

खंडात जे जे जेथे जेथे आहे ते पिंडात कोठे आहे हा निर्णय करा.या घटात ठाकूर कोण

आहे हे सांगा हा ज्ञानाचा खुलासा ज्याला येत नाही.त्याने राम प्राप्त केला नाही हे समजा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।४।।

१६८

।। पदराग धमाल ।।

**जंवरो सोज कहो घट मांही**

**जंवरो सोज कहो घट मांही ।। खण्ड पिंड की गत्त अेक हे हो ।।टेर।।**

खंड पिंडची गती एक आहे तर जसे खंडात जबर यम आहे तर घटात जबर कोण आहे?हे सांगा.।।टेर।।

**कहो कोण काळ कोन जम कहिये ।। कहो कुण मारण हार ।।**
**घट मे ही जीव सीव सो कोहे ।। सो मुझ कहो बिचार ।।१।।**

घटात काळ कोण आहे.यम कोण आहे,मारणारा कोण आहे?घटात जीव कोण आहे, शिव कोण आहे?हे मला सांगा.।।१।।

**कर्मी मन चोर ही मन हे ।। ओहि साउकार ।।**
**इन्द्रियाँ मन सुख दुख पावे ।। त्रिगुटी सुर्ग बिचार ।।२।।**

घटात(शरीरात)कर्म करणारा कोण आहे,धर्म करणारा कोण आहे,सावकार कोण आहे व चोर कोण आहे?घटात(शरीरात)सुख दुःख कोण प्राप्त करतो.घटात(शरीरात)स्वर्ग व नरक कोणत्या ठिकाणी आहे हे सांगा. ।।२।।

**घट मे पीर तिथंकर मन हे ।। सुर नर हे अवतार ।।**
**दांणो देव जगत सो ओई ।। रमता राम बिचार ।।३।।**

घटात पीर कोण आहे,तीर्थंकर कोण आहे?घटात अवतार कोण आहे,घटात नर कोण आहे,देव कोण आहे व दानव कोण आहे तसेच समर्थ हरी कोणी आहे?हे सांगा? ।।३।।

**घटे बढे सोइ मन माया ।। शिव धुन घट मे जाण ।।**
**के सुखराम तत्त बोहो नामा ।। ब्रम्ह एक घट ठाण ।।४।।**

तनात एक नाम(नाव)कोणते आहे?घटात बोलतो कोण?आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,घटात कमी कोण होतो व वाढतो कोण?घटात अचल कोण आहे हे सांगा? ।।४।।

१७२

।। पदराग जोगारंभी ।।

**जी गुराँ भेद बताव ज्यो**

**जी गुराँ भेद बताव ज्यो ।। किस बिध मिलसी जी राम ।।**
**मोख मुक्त पर्लोक को ।। किस बिध परसूं म्हे धाम ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,मला हा भेद दाखवा की,कोणत्या विधीने

राम भेटतील.मोक्ष काय आहे?मुक्ति काय आहे?आणि परलोक काय आहे?हे सर्व मला सांगा आणि त्या धामाला मी कोणत्या विधीने जाऊन पोहोचु.(याचा मला भेद दाखवा.) ।।टेर।।

**जिण जिण बिध हर पावीया ।। सो मुज कहो सब आप ।।**
**सोई सोई बिध सब धार सूं ।। जप सूं अे निस जाप ।।१।।**

(पूर्वी झालेल्या ज्या ज्या संतांना)ज्या ज्या विधीने हर(रामजी)भेटले असेल,ती सर्व विधी मला सांगा?तुम्ही सांगाल ती सर्व विधी मी धारण करीन.तुम्ही सांगाल त्या नामाचा मी जप करीन.।।१।।

**चीर फाड़ कंथा करूं ।। पेरूं इण गळ माय ।।**
**ग्रह तज बन सब ढूंढ सूं ।। जे हर मिलसी आय ।।२।।**

तुम्ही सांगाल तर,माझा कपडा फाडुन कंथा करुन त्याला माझ्या गळ्यात घालीन आणि घरदार सोडुन,सर्व वनामध्ये शोधीन.जर मला हर येऊन भेटेल,तर आपण सांगाल त्याप्रमाणे करीन.।।२।।

**केवो तो ओ जुग कुळ छोड दूँ ।। तन मन करूं कुर्बाण ।।**
**काट काट तन चाड दूं ।। जे हर मिले मुज आण ।।३।।**

तुम्ही सांगाल तर हे जग आणि कुळ सोडुन देईन.तन आणि मनाची कुरबाणी करीन.हे शरीर तुम्ही म्हणाल तर कापून चढवून देईन.मला जर हर भेटेल तर ह्या सर्व विधी करण्यास मी तयार आहे. ।।३।।

**गुफा अे खोद भूमे रहूं ।। कहो तो पाड्रां बिच ।।**
**कवो तो जळ मे डूब रूँ ।। क्हो तो घर गांरे कीच ।।४।।**

तुम्ही म्हणाल तर गुंफा खणून जमिनीत राहण्यास तयार आहे.तुम्ही म्हणाल तर पहाडात जावून,राहण्यास जातो.तुम्ही म्हणाल तर पाण्यात बुडून राहिन.तुम्ही म्हणाल तर घररुपी(चिखलात)मध्ये राहिन. ।।४।।

**जन सुखदेव गुरू यूं कहे ।। सुण तूं सिष सूजाण ।।**
**हर पावे नर साच सूं ।। दूजी लिव सूं जाण ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,हे सुजाण शिष्या,तू ऐक,हर(रामजी)सतगुरुचा विश्वास ठेवल्याने मिळतात आणि दुसरा लिव(भजनाचा नाद)लावल्याने मिळेल.।।५।।

२०१

।। पदराग धमाल ।।

## खण्ड पिण्ड की गत एक है

**खण्ड पिण्ड की गत एक है ।। तन खोजो हरिजन संतो आँण ।।टेर।।**

पिंडाची व खंड ब्रम्हड्ची गती एक आहे हे सर्व संत,सर्व हरीजन शोधा.।।टेर।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**काल क्रोध करम सुण जम है ।। अहुं मारण हार ।।**
**घट में जीव ईन्द्रियां कहिये ।। सोहंग शीव विचार ।।१।।**

खंडात ब्रम्हंड,यमपुरीत यम आहे.तर घटात क्रोध व अहंकार हे यम आहे.खंडात जीव आहे तर देहात इंद्रिय हे जीव आहे.खंडात ब्रम्हांडात पारब्रम्ह शिव आहे तर घटात श्वास हा शिव आहे. ।।१।।

**करमी मन चोर ही मन ।। है ओही साहूकार ।।**
**इन्द्रियां मन सुख दुख पावे ।। भ्रगुटी सुरग विचार ।।२।।**

खंडात चोर आहे तर घटात विषय वासनीक मनच चोर आहे.खंडात सावकार आहे तर घटात दयाळू मनच सावकार आहे खंडात स्वर्ग आहे तर घटात भृगुटी म्हणजे स्पर्शाचे सुख स्वर्ग आहे.या स्पर्श इंद्रियांनी मन स्वर्गासारखे सुख प्राप्त करतो.खंडात नर्क आहे तर घटातही नर्क आहे.हे मन इंद्रियांचे सुख न मिळाल्याने दु:ख प्राप्त करतो,तडपतो तेव्हा नर्कासारखे दु:ख पडतात.।।२।।

**घट में पीर तीरथंगर मन है ।। सुर नर है अवतार ।।**
**दांणू देव जगत सी होई ।। रमता राम विचार ।।३।।**

खंडात तीर्थंकर आहे तर घटात विषय वासनेपासून मुक्त असा मन तीर्थंकर आहे. खंडात सुर नर(देव)अवतार आहे तर घटात मनच सुर नर अवतार आहे.खंडात राक्षस आहे तर देहात मनाचा क्रुर स्वभाव हा राक्षस आहे.खंडात देव आहे तर देहात मनाचा दया स्वभाव हा देव आहे.खंडात रमता राम राहतो तर घटातही रमता राम राहतो.अशी खंड पिंडची एक गती आहे.।।३।।

**घटे बढे सो ही मन माया ।। शिव धुन घट मे जाँण ।।**
**कहे सुखराम तत्त बोहो नामा ।। ब्रम्ह अेक कर जाँण ।।४।।**

जसे खंडात कमी जास्त होणारी ही त्रिगुणी माया आहे.असेच घटात कमी जास्त हे मन माया आहे.खंडात ब्रम्हांडात पारब्रम्ह आहे असे श्वास हे घटात पारब्रम्ह आहे.हे समजा. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,तत्त म्हणजे जीव खुप आहेत व त्यांचे देह वेगवेगळे आहेत.याकरीता जीव तत्तचे देहाचे नाव खुप आहेत.परंतु जसे खंड ब्रम्हंडात सतस्वरुप ब्रम्ह एक आहे.असेच सर्व जीव तत्तात सतस्वरुप ब्रम्ह एक आहे त्याला ओळखा व त्याला प्रगट करा.।।४।।

२०७

।। पदराग बसन्त ।।

## कोन शब्द से कोन होय

**कोन शब्द से कोन होय ।। जन सोच सोध कोहो अरथ मोय ।।टेर।।**

कोणत्या शब्दाने कोणता शब्द उत्पन्न झाला ?हे संतजन विचार करुन शोधून मला सांगा. ।।टेर।।

**बावन हरफ सब सोज बीर ।। कोण शब्द की कोण चीर ।।**
**तत्त पाँच गुण तीन जाण ।। सत्त शब्द मूल मुझ कहो आण ।।१।।**

बावन्न अक्षर,पाच तत्व,तीन गुण ब्रम्हा,विष्णू,महादेव हे कोणत्या शब्दाने प्रगट झाले व सतशब्द जो सर्व शब्दांचा मूळ शब्द आहे त्याला शोधून मला सांगा.।।१।।

**हो रंरकार में बड़ो कोण ।। सुण ओऊँ सोऊँ कहो मोण ।।**
**या च्यार शब्द को करो न्याव ।। कोन शब्द से कोन आय ।।२।।**

ररंकार, ममंकार, ओअम, सोहम या शब्दांमध्ये मोठा कोण आहे?या चार शब्दाच्या उत्पत्तीचा निर्णय करा.कोण कोणापासून जन्मला?हा निर्णय करा.।।२।।

**पाँच तत्त गुण तीन जाण ।। इण ओऊँ शब्द से बण्या आण ।।**
**सुण सोऊँ शब्द का हरफ सेंग ।। जे जीभ पढत मुख करे बेग ।।३।।**

पाच तत्व,तीन गुण हे ओअम शब्दापासून जन्मले ओंकारपासून महतत्व बनला. महतत्वापासून आकाश,आकाशापासून वायू,वायूपासून अग्नी,अग्नीपासून जल व जलापासून पृथ्वी हे पाच तत्व बनले.तसेच महतत्वपासून शक्ती,शक्तीपासून रजोगुणी ब्रम्हा,सतोगुणी विष्णू,तमोगुणी शंकर हे तीन गुण बनले.सर्व बावन्न अक्षर सोहम म्हणजे श्वासाने उच्चारण केले जातात तसेच हे सर्व ररंकार,ममंकार ओअम,सोहम हे चार शब्द जीव व मुखाने वाचले जातात.।।३।।

**च्यार हरफ को मूळ एक ।। या शीश शब्द सोइ इधक देक ।।**
**सुखदेव कहे सो सोध जोय ।। सुण सत्त शब्द सो अधिक होय ।।४।।**

या चार शब्दाचा मूळ एक श्वास आहे.हा श्वास या चारही शब्दांपेक्षा अधिक(जास्त) आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,या श्वासापेक्षा जास्त सतशब्द आहे.तो तोंडाने जीभेने वाचता येत नाही.त्याला शोधणे. ।।४।।

२१३

।। पदराग धमाल ।।

**मै देता हुँ हेला जुग के माय**
**मै देता हुँ हेला जुग के माय ।। ग्यानी हुवे सो सांभळो हो ।।टेर।।**

संसारातील सर्व ज्ञानी ऐका व माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या.।।टेर।।

**कहा ब्रम्ह को घाट घूट हे ।। कंचन रूप हर होय ।।**
**पारब्रम्ह सुई परा ब्रम्ह हे ।। ता बिध रंग कहो मोय ।।१।।**

ब्रम्हचा घाट घुट काय आहे?व हरचे रुप काय आहे?व पारब्रम्ह होणकाळाच्या पलिकडे पारब्रम्ह सतस्वरुप आहे त्याचा रंगरुप काय आहे?ज्ञानी हे मला सांगा.।।१।।

मन को रूप जीव को कहिये ।। को तन को आकार ।।
चित्त सो सुरत कोन उर माना ।। कोन कोन की लार ।।२।।

मनाचे रुप सांगा.जीवाचे रुप सांगा,जीवाच्या शरीराचा आकार सांगा.चित्ताचा आकार सांगा व सुरतचा आकार सांगा.मन,जीव,तत्त,चित्त व सुरत यातील कोणी कोणाच्या आधाराने आहे ते सांगा.।।२।।

बोलण हार कोण बस बोले ।। चुपक किसे बस होय ।।
नव तत्त लिंग स्वरूप बतावो ।। सो जन पूरा जोय ।।३।।

बोलणारा कोणाच्या वश बोलतो आहे व चुप कोणाच्या आधीन होऊन राहतो?नवतत्व लिंग शरीराचे रुप सांगा.हे जो सांगेल तो पूर्ण संत आहे.।।३।।

परगत घाट रूप सो कहिये ।। नेह चल डोल बताय ।।
कहे सुखराम नही जे आवे ।। तो सिख होय पूछो आय ।।४।।

प्रकृतीचे सर्व घाट व रुप सांगा निश्चलचा आकार सांगा.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे येत नसेल तर माझे शिष्य बनून मला विचारा मी आपल्याला सांगून देईल. ।।४।।

२५१

।। पदराग धमाल ।।

नेःहचल को रंग डोल कहुँ हो
नेःहचल को रंग डोल कहुँ हो ।। तम सुणज्यो हो सब संत आय ।।टेर।।

माझ्या घटात निश्चल प्राप्त झाला.या सुखाच्या रंगात मी डोलत आहे.हे सर्व संतजन येऊन ऐका.।।टेर।।

अवगत देव निरंजन मन को ।। रूप रंग तत्त होय ।।
देहि घाट सुणो ओ कहिये ।। दिन चढे सो जोय ।।१।।

अविगत देव निरंजनाच्या मनाचे रुप व रंग तत्त आहे.हे तत्त रंग हंस देहाच्या घाटातून बंकनाळच्या रत्याने वरती दसव्याद्वारात चढतो तेव्हा समजते.।।१।।

बोले चुपक बस नेःहचल के ।। परगत चित्त रंग अेह ।।
नेहचल को तुझ डोल सुणाऊँ ।। पाँच की सब देह ।।२।।

जीवाचे बोलणे,मौन राहणे हे नेःअक्षराच्या वश आहे.सर्व जीवाच्या चित्तचा रंग हा निश्चल प्रगट रंग आहे व सर्व पाच तत्वांचे देह त्या निश्चलचा आकार आहे.।।२।।

नव तत्त का रंग सो नहि दीसे ।। धायो डोल बखाण ।।
के सुखराम अर्थ सो सागे ।। सुणले सिख सुजाण ।।३।।

नवतत्तचा रंग,रुप म्हणजे आकार दिसत नाही.खाल्यानंतर तृप्त झाल्याचे जसे वर्णन करतो.तसे नेःअक्षर प्राप्त करण्याचे सतज्ञान समजणे हे सुजान संत तु समज असे

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।३।।

२९२

।। पदराग मिश्रित ।।

**राजा अेसा भेष हमारा ।।**
**भेदी जके भली बिध जाणे ।। क्रमी लखे न सारा ।।**
**राम रटे प्रमेसर प्यारा ।। रेहे क्रमा सूं न्यारा ।।टेर।।**

हे राजा माझ्या वेषाला कोणी केवली संत असेल तोच योग्य पध्दतीने समजेल.जो कर्मी जीव आहे म्हणजे त्रिगुणी मायेत रचमचलेला जीव आहे तो माझ्या वेषाला जाणणार नाही.हे राजा,जो रामनामाचे रटण करतो तोच परमेश्वर म्हणजे सतस्वरुपाला प्रिय वाटतो आणि तो कर्मांपासून म्हणजे काळापासून मुक्त होतो.।।टेर।।

**कफनी हमे क्षमा की पेरी ।। ग्यान गुदड़ी ओड़ी ।।**
**चोळो अजब दया को गळ मे ।। कुबद कामनी छोड़ी ।।१।।**

हे राजा,जसे वेषधारी(वेश)साधु गळ्यात कफनी घालतात.तर मी क्षमेची कफनी घातली आहे वेशधारी साधु जसे शरीरावर गोदडी ओढतात,तर मी काळाच्या पलिकडील सतस्वरुप ज्ञानाची गोदडी ओढली आहे.वेशधारी साधु शरीरावर चोला ठेवतात तर मी पण जीवांना काळाच्या मुखातून काढण्याचा दयेचा अजब म्हणजे कर्मीनां समजण्याच्या पलिकडील चोळा धारण केला आहे.साधु लोक आपल्या विवाहित स्त्रीला भक्तीत व्यत्यय आणणारी माया समजून त्याग करतात तर मी भक्तीत व्यत्यय आणणारी कुबुध्दी स्त्रीला नेहमीकरीता त्यागून दिले आहे.असा मी अजब तऱ्हेचा वेश धारण केला आहे. ।।१।।

**रमता संग रमू जुग माही ।। इण मन कूं सिष कीनो ।।**
**सत्त सब्द सो गरू हमारा ।। तत्त तिलक सिर दीनो ।।२।।**

जसे वेशधारी साधु धरतीवर त्रिगुणी मायेच्या करणी क्रियामध्ये रमण करतात असेच मी पण पूर्ण जगात रमण करणारे रामजीच्या सोबत घटाला ३ लोक १४ भवन बनवून घटातच त्याच्या सोबत रमण करीत आहे.जसे वेशधारी साधु शिष्य बनवतात.तर मी पण माझ्या मनाला शिष्य बनविले आहे जसे साधुचे गुरु असतात.तसेच माझे गुरु आहे.माझे गुरु सतशब्द आहे.जसे जगात साधु मस्तकावर केसर गंधाचा टिळक लावतात तसेच मी पण सतस्वरुप ब्रम्ह तत्तचा टिळक लावला आहे. ।।२।।

**पोथी पाट बेद सब गीता ।। अणभे रा पट खोलूँ ।।**
**द्वादस मंत्र गायत्री मेरे ।। सत्त सब्द मुख बोलूँ ।।३।।**

जगातील त्रिगुणी मायेचे साधु त्रिगुण मायेच्या पोथ्या चार वेद,गीता,शास्त्राचा पड्दा उघड्तात.तर मी अणभे देशाच्या ज्ञानाचा पड्दा उघड्तो.मायेचे साधु गायत्रीचा मंत्र द्वादस

मंत्रासारखे मंत्र मुखाने जपतात तर मी रामनाम या सतशब्दाचा मंत्र मुखाने जपतो. ।।३।।

**मुद्रा कंठी पावडी अलफी ।। भेद ग्यान की पेरी ।।**
**सास ऊसास अजपो घट मे ।। निर्गुण माळा फेरी ।।४।।**

त्रिगुणी मायेचे साधु मुद्रा,कंठी,खडाऊँ,अलफी अशा वस्तु शरीरावर घालतात.ज्या कारणाने ते साधु म्हणून ओळखले जातात.तर मी सतस्वरुप विज्ञान ज्ञान शरीरावर घातले आहे.ज्यामुळे मी साधु म्हणून ओळखला जातो.त्रिगुणी मायेचे साधु जागृत अवस्थे मध्ये १०८ मण्यांची माळ हाताने फेरतात(माळ जपतात)तर मी शरीरात ३,५०,००,००० मण्यांची निर्गुण माळ श्वास उश्वास अजपामध्ये २४ तास फिरवतो. ।।४।।

**धीरज धरण लंगोटी जर्णा ।। आड़ बंध मत मेरी ।।**
**आ देहे बीण तांत सब नाड़ी ।। रागाँ अनहद गेरी ।।५।।**

महिलांवर नजर पडल्यावर मतात कुबुध्दी येऊ शकते म्हणून महिला तसेच स्वत:च्या मध्ये आड्बंध ठेवतात आणि वैरागी मत बनून ठेवतात.परंतु माझे मतच आड्बंध आहे त्याला परकी स्त्री,कुबुध्दी सुचतच नाही.साधु लोक विणा ठेवतात तर माझा देह हीच माझी विणा आहे.साधुच्या विणेला वाजविण्याकरीता तार असतात तर माझ्या देहाच्या सर्व नाड्या ह्या तार बनल्या आहे.साधु विण्याच्या तारांचा उपयोग करुन वेगवेगळे राग–रागिण्या गातात.तर या राग रागिण्यांपेक्षा वेगळी अशा अनहद शब्दाची राग माझी नाडी–नाडी गाते.।।५।।

**गिगन मंडळ मे मंडी हमारी ।। त्रुगुटी सेवा पूजा ।।**
**सत्त का सब्द जोत के आगे ।। ओर देव नही दूजा ।।६।।**

साधुची जशी पहाडावर साहण्याची मढी राहते.तशी माझ्या देहाच्या गगन मंडळात माझी राहण्याची मढी आहे.साधुची सेवा पुजेचा देव्हारा असतो तसे माझा त्रिगुटीत सेवा पुजेचा देव्हारा आहे.साधुच्या देव्हारात मायेचे अनेक देवी देवतांच्या मुर्त्या असतात.तर माझ्या देव्हाऱ्यात मायेच्या पलिकडील सतशब्द हा देवता आहे आणि माझ्या देव्हाऱ्यात प्रलयात जाणारा कोणी देवता नाही.साधुची सेवा पुजेची पोहच जास्तीत जास्त ज्योती लोकापर्यंत पोहचते तर माझी सतशब्दाची भक्ती ज्योतीलोकाच्या पुढे दहाव्याद्वारात पोहचते. ।।६।।

**अळा पिंगळा करे आरती ।। अनहद झालर बाजे ।।**
**चित्त मन सुरत हजूरी चाकर ।। जिंग सब्द धुन गाजे ।।७।।**

साधुची महिला भक्त आरती करतात तर माझी गंगा,यमुना,सुषमना ह्या आरती करतात. साधु झालर वाजवितात.तर माझ्या घटात अनहद वाजत आहे.साधुच्या सेवेत चाकर

असतात तर माझे चित्त,मन,सुरत हे माझ्या सेवेत चाकर बनून राहतात.साधु शंख वाजवून गर्जना करतात तर माझ्या दसवेद्वारात जिंगशब्दाची ध्वनी गर्जना चालून राहीली आहे.।।७।।

**दे रो भेष सकळ सो माया ।। असत सत्त नही कोई ।।**
**जे कोई भेष सब्द को साजे ।। मोख मिलेगा सोई ।।८।।**

देहाच्यावर बनवलेला सर्व वेश हा माया आहे.तो देहासोबत मिटणारा आहे.हंसाला मोक्ष देणारा नाही म्हणून हंसाकरीता सत नाही असत आहे.वेशधारण केल्याशिवाय मोक्ष नाही.वेश धारण केल्याने मोक्ष आहे.परंतु जो साधु शब्दाचा वेश धारण करेल.तोच मोक्षाला जाईल तो काळाच्या दु:खातून मुक्त होईल.आवागमनाच्या चक्रातून सुटेल.।।८।।

**के सुखराम भेष ओ मेरो ।। जे कोई संत बसावे ।।**
**तिनू ताप तोड़ कर हंसो ।। अमर लोक ने जावे ।।९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज राजाला समजावून राहीले आहेत की,हे राजा जो संत माझा वेश धारण करेल तो संत आधी,व्याधी,उपाधी या तीन तपांना तोड्रून जेथे आधी,व्याधी,उपाधी नाही अशा कोऱ्या महासुखाच्या अमरलोकात जाईल.।।९।।

३१३

।। पदराग कल्याण ।।

**साधो भाई करडु प्रतन सिजे ।।**
**बाळो आग पाँच दस दिन रे ।। सपनेई सळ नही भीजे ।।टेर।।**

जसे धान्यात कूचर दाना असतो,त्या दाण्याला शिजवण्याकरीता पाच दहा दिवस पण एकसारखी आग लावली तरी दाणा जराही नरम होत नाही. ।।टेर।।

**ब्रसे मेह जमी गळ जावे ।। पथर नरम नही होई ।।**
**यूँ क्रमी के ग्यान न लागे ।। सबद भीदे नही कोई ।।१।।**

जसे जमिनीवर पाऊस पड्ल्याने जमीन नरम होऊन जाते.परंतु दगड जराही नरम होत नाही.याचप्रकारे कर्मी मनुष्याला सतस्वरुपाच्या ज्ञानाचे शब्द भिनत नाही.।।१।।

**नागर बेल बाँझ सो नारी ।। फूलाँ कदे न आवे ।।**
**यूं मूर्ख ने क्हो ब्हो तेरो ।। भक्ति नाय संभावे ।।२।।**

नागरवेल तसेच वांझ स्त्री ही कधी फुलू शकत नाही.याचप्रकारे मुर्ख मनुष्याला सतस्वरुपाच्या भक्तीचे कितीही ज्ञान सांगा तो भक्ती धारण करत नाही. ।।२।।

**तस्कर चोर लबाड पूरस के ।। साच बात बिष लागे ।।**
**के सुखराम यूं क्रमी नर रे ।। सत्त सबद सुण भागे ।।३।।**

जसे तस्कर,चोर,लबाड पुरुषाला सत्य गोष्ट विषा समान वाटते.याचप्रकारे कर्मी मनुष्याला सतस्वरुपाच्या महासुखाची गोष्ट विषासारखी वाटते.ज्यामुळे कर्मी पुरुष सतशब्दाचे

ज्ञान ऐकताच ज्ञान सभेतून उठून पळून जातात.।।३।।

८७

।। पदराग बिहगडो ।।

**बिण धावण लोहा जे गाळे**

**बिण धावण लोहा जे गाळे ।। बिन पोया व्हे रोटी ।।**

**तो आ मुगत सेन सूं होवे ।। बिन वाढया व्हे छोटी ।।१।।**

लोहाराचा भाता प्रत्यक्षात न चालवता मनानेच चालवून लोखंड गाळून देईल.तर त्याच्याने लोखंड गळणार नाही.तसेच पोळी लाटल्या शिवायच मनाने पोळी लाटली तर व पोळी बनून गेली समजून घेतले तर पोळी बनत नाही.तसेच लाकूड कापल्याबिना मनाने कापले व छोटे झाले हे समजल्याने छोटे होत नाही.याचप्रकारे सतस्वरुपाची परममुक्ती मनाने भजन करुन घेतले व मुक्ती होऊन गेली असे समजल्याने मुक्ती होत नाही. ।।१।।

**कूवो खिण्याँ बिना जळ काढे ।। बिन चडिया फळ तोडे ।।**

**तो आ मुगत सेन सूं होई ।। फोज लड़या बिन मोडे. ।।२।।**

विहिर खोदली नाही व मनानेच विहिर खोदून घेतले व पाणी काढून घेतले समजल्याने पाणी निघत नाही.तसेच झाडावर चढून फळ तोडले नाही व मनानेच झाडावर चढून गेले व फळ तोडून घेतले समजल्याने फळ तुटत नाही.तसेच शत्रुशी लढाई करण्यास आलेली फौजेशी लढल्याबिना मनातच फौजेशी लढून फौजेला परत पाठवून द्याल तर फौज परतणार नाही असेच मनानेच भक्ती करुन घेतली व माझी भक्ती पूर्ण होऊन गेली.यामुळे माझी परममुक्ती होऊन गेली हे समजल्याने मुक्ती होत नाही. ।।२।।

**काढे खील बीच मे बेता ।। तो धोरे बेल न आवे ।।**

**के सुखराम काज नहि सरसी ।। उलट रसातळ जावे ।।३।।**

चालत असलेली मोट बंद करुन देण्याने मनाने मोट चालवल्याने नालीमध्ये पाणी येणार नाही.असेच विना भजन मनानेच भजन होऊन गेले व मी परममुक्तीत पोहचून गेलो समजल्याने मुक्ती प्राप्त करण्याचे कार्य पूर्ण होणार नाही व उलट भजन न केल्याने रसातळाला जाऊन दु:खात पडतो. ।।३।।

३३९

।। पदराग बिहगडो ।।

**संतो बाद करे सो झूठा**

**वाँ घट करम धस्याहे भारी ।। समरथ साहेब रूठा ।।टेर।।**

संत जो सतगुरुंपासून ज्ञान समजत नाही व त्यांच्याशी वाद-विवाद करतात ते खोटे आहेत.त्या वादग्रस्तांच्या घटात काळ घुसलेला आहे व काळ मारणारा साहेब रुसला आहे.म्हणून ते सतगुरुंशी वाद करतात. ।।टेर।।

राम नांव शिवरण कूं पाले ।। सेन बतावे कोई ।।
गूंगो गाय रीझ जो लेवे ।। तो मुगत सेन सूं होई ।।१।।

रामनामाचे जीभेने रटन करणाऱ्याला जीभ रटण्याच्या विधीला थांबवितात व जीभेने न रटता मनाने रामजी सोबत राहण्यास सांगतात.जर मुका मनुष्य मनाने गाणे गाऊन बक्षिस प्राप्त करु शकतो.तर मनाने जीभ न चालवता रामजीला मानून मुक्ती होऊ शकते.मुका बक्षिस प्राप्त करु शकत नाही तर मनाने भक्ती करणारा मोक्ष कसा प्राप्त करु शकेल. ।।१।।

बोल्या बिना न्याव जे चुके ।। बिन तिरिया नही लांगे ।।
तो आ मुगत सेन सुं होई ।। जे पाण पान बिन भांगे ।।२।।

भांडणाचा न्याय करण्याकरीता तोंडाने बोलावे लागते.तोंडाने न बोलता न्याय झाला असता तर मनाने रामनाम जाणल्याने परममुक्ती होते.मोठ्या नदीमध्ये जर पोहल्या शिवाय नदीच्या दूसऱ्या किनाऱ्याला पोहचू शकलो असतो तर मनाने रामनाम मानून भवसागर तरुन जाईल.ही सतस्वरुपाची मुक्ती मनाने सतस्वरुपाला मानल्याने होते तर घण न मारता दगड फुटायला हवेत.।।२।।

झाडो.दिया बिना बिष पाले ।। बिन जूंझ्याँ व्हे सूरा ।।
तो आ मुगत सेन सूं व्हेली ।। बिन मुख बाजे तूरा ।।३।।

साप,विंचू इत्यादी चा मंत्र उतरविल्या म्हणजे बोलल्याशिवाय मनाने बोलून दिला.हे समजून साप,विंचवाचे जहर(विष)उतरले असते तर परममुक्ती जीभेने न रटता मनाने रामजीला मानल्याने होईल.युध्द क्षेत्रात लढल्याशिवाय मनानेच रणांगणात लढणाऱ्याला कोणी शूरवीर म्हणेल का?जीभेने रामनाम न रटता मनानेच रामजीला धारण केल्याने परममुक्ती झाली असती तर तोंडाने सुर न काढता बासरी,तुतारी इत्यादी वाजे वाजायला हवेत. ।।३।।

हीरा पडया जमी के मांही ।। बिन खिणि यां कोई काढे ।।
तो आ मुगत सेन सूं होवे ।। लोह बिना बन बाढे ।।४।।

हिरे जमीनीच्या आता खोल जागेवर आहे.ते हिरे जमीन खोदल्याशिवाय निघू शकले असते तर सतस्वरुपाची परममुक्ती जीभेने न भजन करता मनाने भजन करुन घेतले हे मानल्याने होईल.वनातील झाडांना लोखंडाच्या शस्त्राशिवाय मनाने समजून तोडले तर परममुक्ती जीभेने न रटता मनाने रटले हे समजून होईल.।।४।।

जब लग आग लगी हे नाही ।। तब लग फूंका दीजे ।।
के सुखराम लग्या फिर पीछे ।। होय नचीता रीजे ।।५।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अरे संत जो पर्यंत आग पकडत नाही

(पेटत नाही)तोपर्यंत फुंकावे लागते.एक वेळ आग पकड्ली(लागली)तर फुंकण्याची गरज राहत नाही.त्याचप्रकारे जोपर्यंत रोमरोमात राम राम अखंडीत होत नाही.तोपर्यंत तोंडाने धारोधार धुव्वाधार रामनाम रटावे लागते.एक वेळ रोम रोमात राम राम अखंड्ति प्रगटल्याने रामनाम रटण्याची गरज पड्त नाही.रामनाम रटल्याने निश्‍चिंत होऊन जातो.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।५।।

३६८

।। पदराग बिहगडो ।।

**संतो राम उथापे झूठा**

**शिवरण बिना काहे की सानी ।। ज्याँ हां सूं साहेब रूठा ।।टेर।।**

संत,जीभ होठाने रामस्मरण करण्याची विधी उलटवून देतात व जीभ,होठ न हलवता मनाने रामजीची भक्ती करण्याचे शिकवितात व स्वत: करतात हे खोटे आहे.त्यांना रामजी प्राप्त करण्याची विधी माहित नाही.यांच्याशी साहेब रुसले आहे. ।।टेर।।

**क्हे क्हे खांड लेत हे सोई ।। मांग आग घर ल्यावे ।।**

**कागद मांह लिखीजे चीजा ।। बाच्या सूं सोई पावे ।।१।।**

साखरेची गरज आहे व साखर घेण्यास दुकानात गेला नाही व घरी बसूनच साखर घेऊन आलो असे केल्याने साखर मिळत नाही.तसेच पूर्वीच्या काळी चुल पेटविण्या–करीता अग्नीची गरज पड्त असे ती अग्नी आजच्याप्रमाणे(सारखी)लायटर किंवा आगपेटी सारखी पेटविली जात नव्हती.ती अग्नी ज्याच्या घरात पेटलेली राहत होती. तेथून आपल्या घरी मागून आणावी लागत असे.ही आग मागण्याकरीता कोणाच्या घरी गेलो व मागितली नाही व मनानेच समजून गेलो की,अग्नी मिळून गेली आता घरी चला तर घरात हातात आग नसल्याने चुल पेटत नाही.असेच मनाने रामराम घेऊन असे समजून मोक्ष होत नाही.घरातील दुकानातून आणण्याच्या वस्तू कागदावर लिहून घेतल्या.परंतु वस्तु दुकानातून आणल्या नाही व पुन्हा पुन्हा वाचून घेतले तरी त्या वस्तु पुन्हा पुन्हा वाचल्याने घरात येतील का?नाही येणार.जसे या वस्तु येत नाही तसे मनाने रामजी गायले व होठ जीभेने गायले नाही तर रामजी घटात येतील का? नाही येणार. ।।१।।

**मुख सूं पढया आगियो लागे ।। लिख लिख सिला तिराई ।।**

**गज सुण टेर हाक सो दीनी ।। फंद काटियाँ आई ।।२।।**

आग लावायची आहे तर तोंडाने आग लावण्याचा मंत्र वाचायला पाहिजे न वाचता मनाने मंत्र वाचून घेतला हे मानल्याने आग लागणार नाही.रामचंद्राने दगडांवर राम शब्द लिहिला होता,तेंव्हा दगड तरले.मनाने दगडावर लिहून दिले हि समज रामचंद्राने तसे केले नाही.दगड तर खूप होते.लिहिण्यास खुप वेळ लागत होता.तरीही दगड तर रामचंद्र

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

लिहित गेले.मनाने दगडावर लिहून दिले हे सांगण्याने होते तर थोड्या वेळात दगडावर लिहिण्याचे काम होऊन गेले असते तरी रामचंद्राने प्रत्येक दगडावर लिहिण्याचे काम का केले?हत्ती तोंडाने जोर लावून हर हर बोलेला तेंव्हा रामजीने हाक ऐकली व हत्तीचा यमाचा फंदा(फास)कापला व उध्दार करुन पुढील अगतीच्या चौऱ्यांशी लक्ष योनीत न पाठवता स्वर्गादिक पाठविले. ।।२।।

**सब ही मांड बावना मांही ।। क्या साहब क्या माया ।।**
**धरिया नाव सकळ सो बंधण ।। केण सुणण कूं भाया ।।३।।**

सर्व सृष्टी बावन अक्षरातच आहे ते साहेब समजा किंवा माया समजा हे सर्व बावन अक्षरात आहे आणि ज्यांचे ज्यांचे रामचंद्र सारखे रामनाम ठेवले आहे ते मोक्ष देण्याचे सांगण्या पुरते व ऐकण्या पुरते आहे.त्यांचे नाव घेतल्याने प्रत्यक्षात मोक्ष मिळत नाही.हे नाव त्यांच्या शरीराचे नाव आहे.त्यांच्या घटात सत्तराम प्रगटला आहे म्हणून त्यांचे नाव रामचंद्र नाही.जर त्यांच्या घटात राम नव्हता व समजून विचार न करता मनाने त्यांच्या देहाचे नाव घेतल्याने मोक्ष मिळाला असता तर आधी रामचंद्राला मोक्ष गुरु धारण न करता व्हायला हवा होता.रामचंद्राला मोक्ष प्राप्त करण्याकरीता गुरु वशिष्ठ करावे लागले व त्या गुरुंच्या विधीने तेंव्हा कोठे त्यांना मोक्ष मिळाला. ।।३।।

**जे कोई नांव सुरत मे राखे ।। तो बावण के मांई ।।**
**चित मन सुरत पवन व्हे भेळा ।। तब लग वो पद नाही ।।४।।**

जे कोणी नाम सुरतमध्ये जसे ओअम सारखे हे भृगुटीमध्ये ठेवून गातात व ते नाव बावन्न अक्षरातीलच आहे.ते नाव बावन्न अक्षराच्या पलिकडील नाही.ज्या नामापर्यंत चित, मन,सुरत,पवन एकटे एकटे किंवा एकत्र मिळून ही पोहचतात तोपर्यंत ही ते चित,मन, सुरत व पवनच्या पलिकडील सुखाने पद मिळाले नाही हे समजा. ।।४।।

**मन सूं नांव सुरत सुं ध्यावे ।। सो मुख क्यूं नहि कहिये ।।**
**परण्यां बिणा नार होय बेठी ।। पीव सुख किम लहिये ।।५।।**

मनाने नाम जप करतात सुरतने नाम जप करतात तर तोंडाने का करीत नाही?जसे पुरुषासोबत विवाह केले नाही व पत्नी बनून पतीच्या सुखाकरीता बसून गेली तर पतीचे सुख मिळेल का?तसेच मनाने व सुरतने नाम प्रगट होऊन गेले व मी नामाचे सुख घेत आहे हे समजल्याने हंसाला रामनामाचे सुख मिळेल का?हे सत्तज्ञान समजा. ।।५।।

**चित मन सुरत थके अे पाचुँ ।। दसवें व्दार समावे ।।**
**जां दिन शब्द बावना बारे ।। मुख बिन हरिजन गावे ।।६।।**

हंस मुखाने रामनाम गाऊन दहाव्याद्वारात पोहचतो व दहाव्याद्वारात पोहचताच त्याचे मुख रामनाम घेण्यात थकून जाते व त्याचे चित,मन,सुरत व पवन पुढे जात नाही.

तेथेच दहाव्याद्वारात सामाऊन जाते.त्यादिवशी त्याच्या घटात बावन्न अक्षराच्या पलिकडील शब्द नेहमीकरीता प्रगट होतो.त्या दिवसापासून हो हरिजन मुखाने रामनाम गाण्याशिवाय रोम रोममध्ये राम राम गातो. ।।६।।

**बावन परे शब्द हे सोई ।। सो सोहँ हम पायो ।।**
**के सुखराम राम मुख रटियो ।। तब वाँ को घर आयो ।।७।।**

असा बावन्न अक्षराच्या पलिकडील जो ने:अक्षर शब्द आहे.तो शब्द मी घटात(शरीरात) प्राप्त केला.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मी मुखाने राम राम रटून त्या शब्दाच्या दहाव्याद्वाराच्या घटात आलो.।।७।।

३१७

।। पदराग कल्याण ।।

**साधो भाई तन धर त्यागी नाहि**
**जे त्यागी तो सत्त सब्द हे ।। ओर सबे ग्रह माहि ।।टेर।।**

साधु बंधु त्यागी तर तो साधु आहे.ज्याने घटात सतशब्द प्रगट करुन होणकाळाला त्यागले आहे.बाकी सर्व होणकाळासारखे गृहस्थी आहे,त्रिगुणी मायेचे भोगी आहे.।।टेर।।

**तन सो धन मन सो माया ।। फिर सक्त सूं चाले ।।**
**मन सोभा मत निस दिन बांधे ।। अेक ग्रहे दुजी पाले ।।१।।**

हे पाच विषयांचे त्यागी व धनाचे त्यागी हे स्वत:ला त्यागी समजतात व मन व तनाला वशमध्ये ठेवण्याकरीता तन,मनाला तापवितात.जगाचे लोक अशा त्यागींची शोभा करतात. म्हणून ते शोभायमान स्वभावाच्या कारणाने तनाला,मनाला रात्रंदिवस काबुमध्ये शक्तीने जखडून बांधून ठेवतात.तरीही यांच्याने कोणी एक बांधल्या जातो तर दुसरा तीन लोकात पळत फिरतो.हे अस्सल त्यागी नाहीत.हे होणकाळ मायेचे भोगी आहेत. ।।१।।

**खुद्या आण सकळ कूं घेरे ।। तिरषा निंद्रा आवे ।।**
**तामस कळे ग्यान अर सो राजस ।। सुपने मे जीव जावे ।।२।।**

हे त्यागी अन्नाचा त्याग करतात तर यांना कधी ना कधी भुख येऊन घेरते व ते अन्न खाऊन घेतात.कोणी तहानलेले राहण्याचा तप करतात तर त्यांना तहान सतावते व केव्हा नां केव्हा पाणी पिऊन घेतात कोणी रात्रंदिवस जागण्याचा तप करतात.तरीही त्यांना केव्हा ना केव्हा झोप येऊन सतावते व ते झोप घेऊन घेतात.तसेच काही त्यागी क्रोध त्यागतात.परंतु केव्हा ना केव्हा क्रोध घेऊन घेतो.काही त्यागी कलह करणे त्यागतात.परंतु केव्हा केव्हा मनात कलह येऊनच जातो.हे राजस म्हणजे स्त्री भोग त्यागतात.परंतु केव्हा ना केव्हा स्वप्नात स्त्री भोगात जातात.असे हे त्यागी असूनही केव्हा केव्हा मायेमध्ये भोग करुन घेतात.।।२।।

**सब आकार नेण सो देखे ।। काम नाद ज्हाँ जावे ।।**

**बास घ्राण गहे सब सारी ।। सुरत सिष्ट फीर आवे ।।३।।**

हे त्यागी डोळ्यांनी स्त्रीयांचे शरीर बघतात तेव्हा यांचा न जाणता काम नाद जागृत होतो. प्राण चांगल्या सुगंधाचा त्याग करतो.परंतु केव्हा ना केव्हा सुगंध पसरल्याने सुगंध घेऊनच घेतात.सुरतने स्त्रीला बघणे त्यागून देतात.परंतु त्यांची सुरत केव्हा ना केव्हा सृष्टीमध्ये बघितलेल्या स्त्रीवर फिरुन जाते. ।।३।।

**मुख मे जीभ रात दिन बोले ।। नाभ कंवळ को बासी ।।**

**के सुखराम लोक तीनु लग ।। सबके गळ जम फासी ।।४।।**

मुखात जीभ रात्रंदिवस त्यागाच्या विचाराने बोलते.परंतु बोलण्यात नेहमी त्यागाचे विचार नाही राहत.केव्हा ना केव्हा भोगाचे विचार येतात म्हणजे येतातच हे त्यागी श्वास भृगुटीत चढवून देतात नामात श्वास आला तर इंद्रिय चैतन्य होतील व काम जागृत होईल म्हणून श्वासाला नामामध्ये येऊ देत नाही.परंतु केव्हा ना केव्हा यांचा श्वास भृगुटीतून उतरुन नाभीमध्ये येतो म्हणजे येतोच अशी या त्यागींनाही माया त्यागते.खुप कठिण पड्ते.तरीही कोणी त्यागी ही माया कठोरपणे त्यागतो व ही माया थोडीही जवळ येऊ देत नाही.तरीही त्याच्या गळ्याची होणकाळ यमाची फासी सुटत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अस्सल त्यागी तर जे जे सतशब्द धारण करतात व मन पाच आत्मांना त्यागतो तोच आहे.तोच होणकाळाच्या फाशीतून सुटतो. बाकी सर्व त्यागी होणकाळाचा चारा आहे. ।।४।।

४०७

।। पदराग कानडा ।।

**त्यागी ओ तुं भेद बिचारे**

**त्यागी ओ तुं भेद बिचारे ।। पीछे घेर कामना मारे ।।टेर।।**

अरे त्यागी(त्याग करणारा)तू हा भेद विचार,मग कामनाला पलटऊन कामनाला मार. ।।टेर।।

**अन सा देव ताय कुं खावे ।। भिष्टा करे गुदा होय बावे ।।१।।**

अरे अन्नासारखा देव(अन्न हे ब्रम्हच्या बरोबरीचा देव आहे.ब्रम्हपासूनच सर्व भुतांची उत्पत्ती आहे.(अन्नाद भवती भुतांनी),अन्न हेच ब्रम्ह आहे.)अशा अन्नाला तू खाऊन जातो.त्या अन्नाला तू विष्टा बनवून गुदाघाटाने फेकून देतो. ।।१।।

**जळसा देव घूंट भर पीया ।। इन्द्रि नाल मूत कर दीया ।।२।।**

आणि जळासारख्या देवाला (जळाशिवाय कोणाचेही एक क्षणही जाणार नाही) अशा जळदेवाला तू घोट भरुन पितो आणि त्या पाण्याचे मुत्र बनवून इंद्रियाच्या नळीने बाहेर काढून फेकून दिले. ।।२।।

**धरणी देव जमी सो माता ।। तां पर नाड्रो खोलण जाता ।।३।।**

ही धरणी देव आहे हिला धरती माता म्हणतात.अशा धरती मातेवर तू लघवी करतो. ।।३।।

**धरणी माय सकळ कुं पाळे ।। तां पर पाँव धरे धर चाले ।।४।।**

ही धरती या करीता सर्वांची माता आहे की ही सर्वांचे पालन पोषण करते.पृथ्वीशिवाय कोणाचे पालन पोषण होत नाही अशा धरती मातेवर तू पाय देऊन चालतो. ।।४।।

**अन जळ आग सरस सो माया ।। तिरिया घाट पुरूष सब काया ।।५।।**

अन्न,जळ आणि अग्नी हे सर्व सरस म्हणजे तारणारी माया आहे,स्त्रीचा घाट आणि पुरुषाचे शरीर,हे दोन्ही शरीर,हे सर्व माया आहे. ।।५।।

**अे सब त्याग दिया सो त्यागी ।। अे संग लियां पचे हे अभागी ।।६।।**

अरे त्यागी ज्याने हे सर्व त्यागून दिले तेच खरे त्यागी आहेत.आदि सत्गुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,सर्व ज्ञानींनो ऐका हे सर्व सोबत घेऊन(पचतात)थकतात,ते अभागी (भाग्यहीन)आहेत. ।।६।।

**के सुखराम सुणो सब ग्याता ।। सत्त ओ त्याग बिरम रस माता ।।७।।**

खरा तर तो त्याग आहे,जो सतस्वरुप ब्रम्ह रसात मस्त आहे.त्याचांच असली त्याग आहे. ।।७।।

२२

।। पदराग बिलावल ।।

**अेसो जुग मो को नही**

**अेसो जुग मो को नही ।। ममता कूं धपावे ।।**

**सुर नर मूनी देवता ।। उणारथ सब गावे ।।टेर।।**

संसारात असा ब्रम्हा,विष्णू,महादेवाचा कोणी ज्ञानी नाही.जो ममतेला तृप्त करेल. सुर,नर, ऋषीमुनी सर्व देवता त्या ममतेची अतृप्ती गातात.

ममता म्हणजे काय?हंसाला(जीवाला)आधीपासून तृप्त सुख नेहमीकरीता,फुकटात मिळणारे,उब न येणारे,आज्ञाकारी असे नव्या नव्या प्रकारचे सुख,असेल गर्भाचे,तनाचे, मनाचे येऊन येऊन पडणारे म्हातारपणाचे चौऱ्यांशी लाख योनीचे,चौऱ्यांशी प्रकारच्या नरकाचे,अगतीचे असे दु:ख अजिबात नकोत.अशी हंसाला जी चाहणा आहे त्याला ममता म्हणतात.।।टेर।।

**पच पच मरगा मानवी ।। सुर देवत सारा ।।**

**राम रहिम ही पच मऱ्यां ।। इण ममतारे लारा ।।१।।**

सर्व मनुष्य तेहतीस कोटी देव,ब्रम्हा,विष्णू,महादेव इत्यादी सर्व देवता राम आणि रहीम हे सर्व आपली ममता तृप्त करण्यात पचून पचून मरुन गेले.परंतु हे कोणी आपली ममता तृप्त करु शकले नाहीत. ।।१।।

आद भवानी भरम मे ।। दुख पावे रे भाई ।।
निराकार निरबाण ने ।। ममता ले आई ।।२।।

इच्छा आदभवानी पण ममता तृप्त करण्याच्या भ्रमात सृष्टी रचनेत अटकून गेली व दु:ख भोगत आहे.पारब्रम्ह निराकार निर्वाणला तिची ममता सृष्टी बनविण्याकरीता घेऊन आली. ।।२।।

साधु पिंडत सिध के ।। ममता दुं लागी ।।
पर आतम बस करे ।। दूणी होय जागी ।।३।।

साधु,पंड्ति,सिध्द यांच्यातही ममतेची आग भड्कली आहे.दूसऱ्यांची आत्मा वश करणारे सिध्दाईमध्ये दुहेरी म्हणजे खुप ममता जागृत झाली आहे. ।।३।।

निरगुण सुरगुण ग्यान हे ।। चडियाँ दोऊँ आपे ।।
केवळ बिन सुखराम क्हे ।। ममता नही धापे ।।४।।

निर्गुण व सगुण हे दोन्ही ज्ञानी ममता तृप्त करतील अहंपनाच्या झाडावर चढून बसले आहे.परंतु हे पचून पचून थकून जातील.तरीही याच्याने ममता तृप्त होणार नाही.हे सगुण व निर्गुणचे ज्ञानी यांनी ममता तृप्त करण्याकरीता हंसाने पाच आत्म्याप्रमाणे, असेल मनाप्रमाणे,काम,क्रोध,लोभ,मोह,मत्सर,अहंकार यांच्याप्रमाणे सुरत तसेच चित्ता प्रमाणे राहून पाहिले, सुखी होण्याचा प्रयत्न करुन बघितला.तसेच त्रिगुणी माया आणि होणकाळाशी लागून राहीला.तरीही याची ममता तृप्त झाली नाही.जेव्हा कैवल्य ज्ञान घटात प्रगट होते.तेव्हा हंसाच्या उरातून जी सुखाची कल्पना होती त्याच्या पलिकडील सुख त्याला मिळतात असा तो तृप्त होतो.त्याची ममता तृप्त होते नंतर ती कधी अतृप्त राहत नाही. ।।४।।

४१७

।। पदराग बिलावल ।।

वा कळ तो पावे नही

वा कळ तो पावे नही ।। जासुं ममता धापे ।।
जब लग कुळ का करम हे ।। चडया रे आपे ।।टेर।।

ज्या कलेने हिकमतीने हंसाची ममता तृप्त होईल ती कला प्राप्त करीत नाही व ज्याच्याने ममता आणखी अतृप्त होईल असे ब्रम्ह व माया या कुळाचे कर्म करतात म्हणजे ब्रम्ह व माया कुळाचे कर्म करुन ममता मिटून जाईल.या अहंममध्ये राहतात अशा कर्माची ममता कधी तृप्त होणार नाही. ।।टेर।।

जोगी लागा जोग सुं ।। भोगी भोगा के तांई ।।
साधु लागा ध्यान सुं ।। रिष ममता माही ।।१।।

जसे योगी योगाने ममता तृप्त करु इच्छीतो,भोगी पाच इंद्रियांचे रस पिऊन पिऊन

ममता तृप्त करु इच्छीतो,साधु भृगुटीचे ध्यान लाऊन ममता तृप्त करु इच्छीतो तर ऋषीमुनी वेद पुराणाच्या करण्या करुन ममता तृप्त करु इच्छीतो.या कोणत्याही विध्यांनी ममता तृप्त होत नाही.ह्या सर्व विध्या ब्रम्ह व मायेच्या आहेत.ममता ब्रम्ह मायेच्या विधीने तृप्त होत नाही.ममता ब्रम्ह व मायेच्या पलिकडे सतवैराग्याने तृप्त होते हे कोणी शोधत नाही, धारण करीत नाही.।।१।।

**ग्यानी लागा ग्यान सुं ।। सुरता सुण वाके ताई ।।**
**आचारी षट करम की ।। समसेर समाई ।।२।।**

ज्ञानी वेद शास्त्राच्या ज्ञानाने ममता तृप्त करण्यात लागले आहे.तर श्रोता वेद शास्त्राचे ज्ञान ऐकून तश्या करण्या करुन ममता तृप्त करण्यात लागले.जोगी,जंगम,सेवडा,संन्यासी, फकीर ब्राम्हण हे सहा आचारी सहा कर्मांच्या आचारांवर ममतेशी तलवार घेऊन लढत आहे.ह्या सर्व विध्या ब्रम्ह माया कुळाच्या आहेत.ज्याच्याने ममता तृप्त होईल अशी ही सतवैराग्याची विधी नाही. ।।२।।

**रैत राज मरजाद कूं ।। खसताँ दिन जावे ।।**
**इखर ब्रम्ह सुं आद ले ।। अेकण मोल बिकावे ।।३।।**

राजा प्रजाहिताचा राजा बनून व प्रजा राजहितात उच्च बनण्याची मर्यादा ठेवतो.राजा व प्रजा चांगला राजा व प्रजा बनण्यात झटतात व आपले मनुष्य देहाचे दिवस झटण्यात घालवतात.दोघांपेक्षा ही चांगला राजा व चांगली प्रजा बनणे ममता शेवटपर्यंत तृप्त होत नाही. ।।३।।

**सागे सतगुरू पाविया ।। भरमणा सब खोवे ।।**
**जब ममता सुखराम केहे ।। तिरपत होय सोवे ।।४।।**

जेव्हा खरे सतगुरु भेटतात व ते ज्ञानाने जोग(योग)भोग,ध्यान,ज्ञान,आचार,राजा प्रजेची मर्यादा हे सर्व कसे कर्म आहे व हे कर्म ममता तृप्त करण्याकरीता कसे खोटे आहेत,भ्रम आहे हे हंसाला(जीवाला)समजावणे व ज्याच्याने कर्म कापले जातात ते सतवैराग्य विज्ञानाची कला सांगतात अशी सतविज्ञानाची कला जो हंस(जीव)धारण करतो त्याची ममता तत्काळ सहजात तृप्त होऊन झोपून जाते म्हणजे मिटून जाते असे आदि सतगुरु सुखरामजी बोलले.इतर कोणतीही विधी कितीही कष्ट देऊन देऊन केली तरी ही ममता तृप्त होत नाही.।।४।।

१९१

।। पदराग मंगल ।।

## कळ जुग पूरण जोय

**कळ जुग पूरण जोय ।। सूणो जब आवसी ।।**
**बाँभन दुज कुं ब्याय ।। परण घर लावसी ।।१।।**

जेव्हा उच्च कुळातील ब्राम्हण निच कर्म करणाऱ्या स्त्रिशी विवाह करुन तिला घरात आणेल तेव्हा पूर्ण कलीयुग आले हे समजणे. ।।टेर।।

**तीरथ सेवा धाम ।। सबे मिट जावसी ।।**
**जात बरण कूळ नाय ।। बीषे मथ खावसी ।।२।।**

जेव्हा गंगा,यमुना,सुषमणाच्या या तीर्थांवर जाण्याने ब्रम्हा,विष्णू,महादेवाची भक्ती केल्याने व त्यांच्या धामास गेल्याने पुण्य प्राप्त होते हा भाव पूर्ण मिटून जाईल तेव्हा कलीयुग पूर्ण आले हे समजावे.संसारात जाती,वर्ण आणि कुळ हे काही ही राहणार नाही.उच्चकर्म,उच्च जातीची स्त्री निच कर्मी जातीच्या पुरुषासोबत विषय वासना भोगेल तेव्हा पूर्ण कलीयुग आले हे समजावे.।।२।।

**बेटी मते बर सोज ।। के लगन ली खावसी ।।**
**नर पत भिक्षा लाट ।। खजाने लावसी ।।३।।**

कन्या आपल्या मनाने वर शोधून स्वत:चे लग्न करेल व राजा भिक्षुकाच्या कमाईत हिस्सा ठेवेल व ते भिक्षेत मिळलेले धन आपल्या खजान्यात टाकेल अशी वेळ जेव्हा येईल तेव्हा पूर्ण कलीयुग आले हे समजावे. ।।३।।

**पती बरता की जोड़ ।। डोरी जुग गावसी ।।**
**मंतर मूठां सीख ।। पिंडतं नर कवावसी ।।४।।**

पतिव्रता स्त्रीवर अपशब्दाच्या कविता रचतील व जग त्या कवितांना आवडीने गातील. मैले मंत्र,मुठ चालविण्याची विद्या शिकलेल्या निच लोकांना पंड्तिजी म्हणून मानतील तेव्हा पूर्ण कलीयुग आले हे समजावे.।।४।।

**ता दिन कळजुग पूर ।। कळा सो धारसी ।।**
**जाँ स्हा दंड साच ।। खोडे मे मार सी ।।५।।**

ज्या दिवशी कलीयुग पूर्ण कळा धारण करुन घेईल त्या दिवशी परोपकारी धनवानाला खोडा(लाकडाचा पायात घालण्याचा खोडा)टाकून मारतील त्या दिवशी पूर्ण कलीयुग आले हे समजावे.(लागडाचा पायात घालण्याचा खोडा बनवला जातो.पायात खोडा टाकून खोड्यात किल्ली ठोकून दिली म्हणजे त्याला चालता फिरता येणार नाही.त्याला खोडा म्हणतात.)।।५।।

**घोड़ी गधी के दूध ।। सांडयाँ के होवसी ।।**
**सूरी कुत्ती गज दूय ।। जक्त भिलोवसी ।।६।।**

हत्तीण,घोडी,गाढवीण,सांड्णी,डूकरीन,कुत्री इत्यादी जनावरांचे दूध(काढतील)त्याचे दही बनवून घुसळून तूप काढतील व गायी,म्हशीपेक्षा उच्च प्रतीचे दुध तूप समजून पितील त्या दिवशी पूर्ण कलीयुग आले हे समजावे.।।६।।

सामा मिलीयां राम ।। नही कोई भाखसी ।।
अेक निमष ईतबार ।। कोई नही राखसी ।।७।।

समोरा समोर भेटल्यावर एकमेकांना राम राम कोणी करणार नाही.आपसात पापणी लवण्या इतकाही विश्वास करणार नाही. ।।७।।

बेद पुराण बीचार ।। भक्त सो थाकसी ।।
हर बिन कथणी जोड़ ।। जक्त मे भाकसी ।।८।।

वेद पुराणाचे भक्त वेद पुराणाची भक्ती करण्यात थकून जातील व ते भक्ती पूर्ण न करता सोडून देतील.ब्रम्हा,विष्णू,महादेवांच्या कथा सोडून विषय वासनांच्या कथा जोडतील व त्या कथा जगात गातील. ।।८।।

भक्त करताँ जोय ।। हेरो दे पकड़सी ।।
औरत सुण भ्रतार ।। गवाड़ चड़ झगडसी ।।९।।

ब्रम्हा,विष्णू,महादेवाची भक्ती करणाऱ्यांवर नजर ठेवून त्या भक्तीवाल्याला कैद करतील पत्नी पतीसोबत भर रत्यावर कोर्टात इत्यादी जागी भांडेल. ।।९।।

पाँच बरस की के बाळ ।। गंगा छिप जावसी ।।
तब कळ जुग सुण सेंग ।। हळाहळ आयसी ।।१०।।

पाच वर्षाच्या मुलीला मुल होईल गंगा,यमुनेचे पुण्यांचे महत्व संपून जाईल त्यांना देवता न समजता फक्त पाण्याची नदी समजतील तेव्हा कलीयुग हलाहल विषासारखे येऊन गेले हे समजावे. ।।१०।।

माणस गज सम बेत ।। पाखंड ब्हो चालसी ।।
सुभ बातां सब सेंग ।। असल सो पालसी ।।११।।

स्त्री–पुरुषांची उंची तीन फुटापासून वीतभर असेल व जगात अनेक प्रकारचे निच पाखंड, ढोंग चालतील.चांगल्या गोष्टी,खऱ्या गोष्टी,शुभ गोष्टी लोक चालू देणार नाही या शुभ गोष्टींना लोक बंद करुन देतील. ।।११।।

अेक ऋषी कूं घेर ।। ब्होत बीध मारसी ।।
क्हे सुखदेव अवतार ।। तके दीन धारसी ।।१२।।

दृष्ट लोक वेदातील प्रविण ऋषींना घेऊन अनेक प्रकारे मारतील तेव्हा कलीयुगाला मिटविण्याकरीता अवतार प्रगटेल असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।१२।।

३७१

।। पदराग केदारा ।।

संतो सुणो भेष भूलो जाय
कळजुग आणर पेठो हे घर मे ।। षटदर्शन कै आय ।।टेर।।

संत एका ढोंगी साधु षटदर्शनांच्या वेशासारखे वेश बनऊन जगात फिरत आहे.हे षटदर्शनींची उच्च करणी तर करत नाही.उलट षटदर्शनींना लाज उत्पन्न होईल असे षटदर्शनींचे वेश धारण करुन निच करण्या करतात.यांच्या घटात कलीयुग येऊन बसला आहे.या कलीयुगाच्या कारणाने याची मती(बुध्दी)षटदर्शनींची शुभ करणी करण्याची न राहता निच अशुभ करण्या करण्याची बनली आहे. ।।टेर ।।

**सांग बणायर स्यामी हुवा ।। भेद न जाण्यो कोय ।।**

**दुनियाँ सुं लड लड पेट भरियो ।। जाय जलम युँ खोय ।।१।।**

साधुचे ढोंग धारण करुन स्वामी होऊन बसून गेले व परमात्मा सर्वांचे पोट भरतो हा भेद जाणला नाही हा विश्वास ठेवला नाही.या कारणाने संसारात शिष्यांच्या घरी जाऊन शिष्यांशी भांडून भांडून पोट भरतात व आपला मनुष्य देह मोक्ष प्राप्त करण्याचा भेद न जाणता भांडून पोट भरण्यात व विषय विकारात घालवून देतात.।।१।।

**आंटो माँगे पईसा जोडे. ।। दे दुनियाँ मे ब्याज ।।**

**घर घर को सुण न्यावज चावत ।। ओ किम होवे काज ।।२।।**

शिष्यांच्या घराघरात जाऊन पिठ मांगतात.पिठ विकून पैसे जोडतात व पैसा तीर्थ धामात न लावता जगाच्या विकारी स्त्री पुरुषांना व्याजाने वाटतात.आपले घर(त्यागतात) पत्नी, मुलगा,मुलगी त्यागतात व ज्यांना पिठ,पैसा मागतात.अशा विकारी लोकांच्या घरात घुसून घुसून त्यांचे भांडण-तंटे(झंझट)मिटविण्याचे काम केल्याने वैरागी बनून साधु बनण्याचे त्याचे कार्य कसे पूर्ण होणार? ।।२।।

**अमल तमाखु भांग तिजारो ।। ऊडो ल्याव स ताब ।।**

**के मेरे सुण पेट मारूं ।। के पाडु तेरी आब ।।३।।**

हे साधु आफीम,तम्बाखु,भांग,पोस्त इत्यादी नशीले पदार्थ खातात.हे साधु उडो म्हणजे गावाच्या लोकांच्या घरी साधुंची खाण्याची बारी(पाळी)बांधलेली असते.त्या लोकांकडे जाऊन आज माझी पाळी आहे असे सांगतात.असे खाण्याकरीता बारी(पाळी)बांधण्याच्या विधीला उडो म्हणतात.याप्रकारे पुन्हा पुन्हा लवकर लवकर जाऊन लोकांना संताप देतात,भांडण करतात,त्रागा करतात,इज्जत घेतात,पोटावर मारुन मारुन तमाशे करतात.हे वेशधारी साधु मोक्ष प्राप्त करण्याकरीता साधु बनले होते.हे साधु असे नशेमध्ये राहून जगातील सज्जन लोकांना दु:ख देतात तर मग हे मोक्षाला कसे जातील?।।३।।

**षटदर्शण सब करणी छोडी ।। राख्यो तन अंहकार ।।**

**के सुखदेव अरू बेर भगत सूं ।। किम उतरेला पार ।।४।।**

हे ढोंगी षटदर्शंनी साधु षटदर्शनाच्या सर्व क्रिया करण्या त्यागून देतात व जगात फुललेल्या शरीराने वेशाच्या अहंकारात फिरतात आदि सतगुरु सुखरामजी महाराज

सांगतात हे ढोंगी षटदर्शनी जे परमात्म्याचे खरे भक्त आहे त्याच्याशी खुप वैर करतात,भांडण करतात.जेव्हा कि हे षटदर्शनी साधु मोक्ष प्राप्त करण्याकरीता वैरागी साधु बनले होते.तर यांना अशा निच करण्यांनी हे साधु मोक्षाला कसे जातील? ।।४।।

३८७

।। पदराग केदारा ।।

**सुणज्यो बाबा कळजुग बरत्यो आय**

**अेताई थाणा पाड़ दिया हो ।। जीत लिया जुग माय ।।टेर।।**

वेदांनी,शास्त्रांनी तंबाखु खाणे,पिणे,सुंघने,दाताला लावणे हे महापाप सांगितले आहे. याकरीता तंबाखू खाणे,पिणे,सुंघणे,दाताला लावणे हे महापाप आहे असे ब्राम्हण समजत होते व आपल्या ज्ञानातही वेद,शास्त्राचा आधार देऊन सांगत होते तेच ब्राम्हण आज तंबाखू खातात,पितात,सुंघतात,दाताला लावतात व दुसऱ्यांनाही खाणे,पिणे,सुंघणे, दाताला लावण्याचे ज्ञान देतात. ।।टेर।।

**ब्राम्हण कूं सुण पिवे तमाखू ।। स्यामी अेमख खाय ।।**

**तुळछी ऊगे नीच के हो ।। गऊ भिष्ट कूं जाय ।।१।।**

हे ब्राम्हण सतयुग,त्रेतायुग व द्वापार युगार तंबाखुला हातही लावणे पाप समज होते.तेच ब्राम्हण कलीयुगात तंबाखु खाणे,पिणे ही पाप समजत नाही असे ब्राम्हणांचे उच्च विचारांना कलीयुगाने निच करुन दिले.जंगलात राहणारे संन्यासी आधी फळ फुल खात होते.तेच संन्यासी कलीयुगात मासे,पक्षीसारख्या निच वस्तूचे भक्षण करतात.सतयुग, त्रेतायुग,द्वापारयुगात तुळशी पवित्र जागी उगवत असत.आता ती तुळशी शेतात विष्टेचे खत देऊन देऊन इतर शेतीच्या वस्तुंसारखे धंदा करण्याकरीता उगवले जाते.अन्य युगात संसारातील दयाळू लोक गायीला पोटभर चारा देत होते.भूखी राहू देत नव्हते. परंतु आता गायीला पोटभर खाण्यास मिळत नाही म्हणून भुकी गाय आज नाईलाजाने विष्टेसारखी निच वस्तु खाऊ लागली आहे. ।।१।।

**बेटी सांटे बापज परणे ।। झुठ साच कर जाय ।।**

**पईस्या किन्या का सरब गिणावे ।। सूंक ज भाड़ा खाय ।।२।।**

खोट्या गोष्टीला खरे करुन पिता आपल्या कन्येची साठ गाठ करुन आपला विवाह रचतात कलीयुगात कन्यादान न करता कन्या विक्रय करुन मुलावाल्यांकडून कन्येचे पैसे घेतात.सतयुग,त्रेतायुग,द्वापारयुगात जगाचे लोक मुलींचे लग्न जमविण्यात धर्म समजत होते.परंतु आता विवाह(लग्न)जमविणे दलाली समजतात व दलालीचे पैसे घेतात.माता पिता आधी आपल्या कन्येला पैशांकरीता निच कर्म करवतात व पैसे कमावतात व ते पैसे आपल्या विषय विकारात लावतात. ।।२।।

**निरपत सो सुध न्याव न भाषे ।। प्रजा डंडे बिन खून ।।**

प्रथम तो सुण ध्रम न कर हे ।। जे बावे ते भून ।।३।।

सतयुग,त्रेतायुग,द्वापारयुगात राजा शुध्द न्याय करत होते.परंतु कलीयुगात राजा शुध्द न्याय करत नाही.प्रजेचा काही गुन्हा नसतांना त्यांना भारीहून भारी दंड देतात. कलीयुगात कोणालाही आधी तर धर्म पुण्य करण्याची इच्छाच नसते.तरीही कोणी धर्म पुण्य करतात तर जसे भाजलेले धान्य शेतात पेरल्यानंतर धान्य उपजत नाही तसे धर्म पुण्य करतात. ।।३।।

नीच घरां को दान ज झेले ।। नीची संगत जाय ।।
आशिर्वाद सो पहली देवे ।। विपर सो जुग माय ।।४।।

वेदाची(समज)ठेवणारे ब्राम्हण निच पेक्षा कर्मीच्या घराचे दान घेतात.ब्राम्हण असे ज्ञानी निच कर्मी लोकांच्या संगतीत राहून निच वस्तु खातात,पितात व विषय रस भोगतात. ब्राम्हण लोक निचपेक्षा निच कर्मी शिष्यांना धनाच्या लालचेने शिष्य नमन करण्याच्या आधीच काही विचार न करताच आधीच आर्शिवाद देऊन देतात. ।।४।।

गुरड़ा बेद सो बाचन लागा ।। शुद्र सो गुरू होय ।।
के सुखदेव कळजुग की बाताँ ।। क्हाँ लग कहूं में जोय ।।५।।

निच कर्म,निच हरकत करणारे दृष्ट लोक वेद व्याकरणाचे आपल्या निच समजने अर्थ लावतात व ते अर्धवट गुरु बनून शिष्यांना समजावतात व शिष्य शाखा चालवतात. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कलीयुगामध्ये जागो जागी निच मती आली आहे हे जगाचे दाखले देऊन कोठपर्यंत तुम्हाला सांगु. ।।५।।

३९२

।। पदराग बिहगडो ।।

सुणो सिष अेसा कळ जुग आसी
पखे पखे सब ग्यान कथेला ।। आपो बहोत सरासी ।।टेर।।

अरे शिष्य ऐक भविष्यात असे कलीयुग येणार आहे.सर्व लोक आपले आपले मतज्ञान सांगतील आणि आपली ज्ञानी ध्यानी बनण्याची शोभा स्वतःच करतील.।।टेर।।

परमारथ कुं नेक न जाणे ।। स्वारथ कूं ऊठ धावे ।।
सुभ सुभ क्रम सकळ सो त्यागे ।। असुभ सबे चुण खावे ।।१।।

परमार्थ म्हणजे परसुखाकरीता थोडेही झुकणार नाही.परंतु स्वार्थ म्हणजे सुखाकरीता त्याच्यात पर दुःख कितीही राहीले तरीही उठून उठून पळतील.ज्याच्यात सर्वांना सुख मिळते.असे सर्व शुभ शुभ कर्म त्यागतील व ज्याच्यात स्वतः सोडून इतर सर्वांना महादुःख पडणारे राहीले तरीही शोधून शोधून सर्व अशुभ कर्म करतील. ।।१।।

सरब जात के खाता फिरसी ।। ग्यान सकळ कूं देला ।।
नीच ऊँच को पख नही करणा ।। पूज्यां इधक कहेला ।।२।।

उच्च निच खाणारे सर्व जातीचे लोक सोबत बसून उच्च निच खातील व निच कर्म करणाऱ्यांकडून सुध्दा वेद,पराणाची जप,तप यज्ञ ह्या करण्या करवतील.निच कर्मी व उच्च कर्मी हा भेदभाव ठेवणार नाही व निच कर्मी मनुष्यांची पुजा करतील व त्यागा उच्च कर्मीपेक्षा अधिक मानतील. ।।२।।

**माहो मांह निंद्या बोहो चुगली ।। अेक ध्रम बिच व्हेगा ।।**
**माठा क्रम निष्ट कर आसी ।। तां की पूजा लेगा ।।३।।**

परिवारात, समाजात, आपसात एक दूसऱ्यांच्या निंदा, चुगल्या, खुप चालतील. कुकर्म, नित्कृष्ट कर्म करुन येतील अशा निच लोकांची ब्राम्हण पुजा ग्रहण करतील, बढाई (मोठेपण) करतील. ।।३।।

**भांग तमाखु अमल तिजारो ।। सुरे पियेगो भाई ।।**
**तज घर बार लोहो सस्तर सूं ।। मार मरेगो जाई ।।४।।**

भांग,तंबाखु,अफीम,पोस्त,दारु पितील व आपले घर सोडून साधु बनतील शस्त्र बांधून लोकांशी लढाई करतील तेथे लोकांना शस्त्रांनी मारतील व स्वत: मरतील. ।।४।।

**सिष सो मेर म्रजाद न राखे ।। गुरू करसी सुण आसा ।।**
**मूंढे भजन अंतर मे माया ।। दिल गुंथेला पासा ।।५।।**

गुरुची मान मर्यादा शिष्य काहीच ठेवत नाही व गुरु शिष्याला आपल्या गुरुपेक्षा ही जास्त मर्यादा ठेवतील.गुरु लोक शिष्यापासून(जवळून)धनमाल,भोगाची आशा करतील. भक्तीची आशा करणार नाही.हे साधु तोंडाने भजन करतात.असे दाखवतील व आत माया जोडण्याचे व विषय विकारांच्या विकारात फिरतील.।।५।।

**क्रोड़ निनाणु कळजुग माही ।। नरक माँह सब जावे ।।**
**क्हे सुखराम भणो सो गीता ।। बेद भागवत गावे ।।६।।**

कलीयुगात याप्रकारचे ९९ करोड साधु नरकात जातील.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ते गीता वाचोत,वेद वाचोत किंवा पुराण वाचोत हे सर्व नरकात जातील असे वेद,भागवत स्वत: गातात. ।।६।।

१८४

।। पदराग केदारा ।।

**जुग मांहि सोही फकीर बखाण**
**ओर सबी अे ठगरे ठगारा ।। रहया हे जक्त सुख माण ।।टेर।।**

जगात बंकनाळच्या रस्त्याने उलटून गडावर चढून गेला व मालका सोबत गोष्ट करुन राहीला.तोच खरा फकीर आहे,बाकी सर्व फकीर दिसतात.परंतु ते फकीर नाहीत ते ठग आहे व ते जगाला माया ही सुख देणारी खरी मालक आहे असे ज्ञानाने ठगवून मायेत अटकवितात. ।।टेर।।

**असल जोगी टुकड़ा माँगे ।। ओर सकळ को त्याग ।।**
**दुनिया सेती नांय परोजन ।। रहया हे राम सूं लाग ।।१।।**

अस्सल योगी,त्रिगुणी मायेपासून संसाराचे सर्व सुख त्यागून गावात तुकडे मागून पोट भरतो व रामनामाशी लागलेला राहतो.त्याला जगाच्या लोकांशी थोड्ही(   )घेणे–देणे राहत नाही.तो मालीक रामजीशी रचून मचून राहतो. ।।१।।

**ऊलटी जगत की क्रणा आवे ।। दया घणी घट मांय ।।**
**बणे तो किसी पर मेहेर कीजे ।। दु:ख बटावण जाय ।।२।।**

अस्सल फकीराला स्वत:च्या दु:खाची पर्वा राहत नाही.उलट दुनियेला काळ खातो याची करुणा(दया)येते.त्याच्या घटात खुप दया राहते.त्याच्याने होईल तोपर्यंत कोणावर ही दु:ख पड्लेले दिसले तर त्याचे दु:ख वाटण्यास चालला जातो. ।।२।।

**फेर फकिर ज्याँ फिकर न ब्यापे ।। मस्त रहे दिन रात ।।**
**जन सुखदेव क्हे उलट गढ चडीयाँ ।। करे धणी सू बात ।।३।।**

असली फकीराला काळाची कधी फिकर(काळजी)वाटत नाही तो आपल्या मालीक सोबत रात्रंदिवस मस्त राहतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अस्सल फकीर बंकनाळच्या रत्याने गडावर चढतो व मालकासोबत पोट भरुन गोष्टी करतो. ।।३।।

३२०
।। पदराग कल्याण ।।

**साधो भाई त्याग दिया हम सोई ।।**
**मात पिता अरूं नार सुत बंधु ।। अेक न राख्यो वो कोई ।।टेर।।**

साधु बंधु मी जसे जगाचे साधु,आई,वडिल,मुलगा,मुलगी पत्नी,भाऊ इत्यादी त्यागून बनतात तसे मी पण आई वडिल,मुलगा,मुलगी,पत्नी यांना त्यागले.।।टेर।।

**ममता माय बाप डिग पच रे ।। नार कल्पना त्यागी ।।**
**सुत सो सोच अहुँ बळ बंधु ।। छाड़ सुरत हर लागी ।।१।।**

जसे त्यागी साधुने आईला त्यागले तर मी देहधारी मातेला नाही त्यागले तिला सोबत ठेवले.व मी आईमध्ये जशी ममतारुपी माया राहते ती माझ्यामध्ये प्रगटलेली ममतारुपी माया माता त्यागली.जसे त्यागीने वडिलांना त्यागले तर मी देहधारी वडिलांना नाही त्यागले.वडिलांमध्ये संकल्प–विकल्परुपी पितामाया असते अशी माझ्या घटात उपजलेली संकल्प–विकल्प माया त्यागली.मी त्यागी साधुसारखे देहधारी स्त्री त्यागली नाही.मी माझ्या मनात इंद्रियांची कल्पना स्त्री राहत होती ती कल्पना स्त्री मी त्यागली.त्यागी साधुने पुत्र(मुलगा)त्यागला मी पुत्राला नाही त्यागले.पुत्रामध्ये माझ्या घटात फिकीर (काळजी)उपजते.ती त्यागली त्यागी साधुने बंधु(भाऊ)त्यागले मी माझे बंधु नाही

त्यागले.बंधुच्या कारणाने माझ्यात जे अहम उपजत होते ते त्यागले.याप्रकारे या सर्वांना त्यागून मी माझी सुरत रामजीत लावली.।।१।।

**बिभो बंछना सारी छांडी ।। कुळ बोवार ज कारा ।।**
**पइसा टका तज्या मै तेरे ।। सत्त मत्ता वो हमारा ।।२।।**

त्यागी साधुने वैभव त्यागले तर मी वैभवापासून उपजलेली वंछ्ना त्यागली.वासनांच्या वासनांच्या विकारांचे सुख त्यागले,वैभव नाही त्यागले.त्यागी साधुने कुळ त्यागले तर मी कुळाच्या मोह ममतेचे व्यवहार त्यागले कुळ नाही त्यागले.त्यागी साधुने पैसा त्यागला तर मी पैशापासून उपजणारे मी,तू त्यागले व माझे सतमत रामजीमध्ये लावले. ।।२।।

**सेज सोड आन सब छाडया ।। कपट बेल रथ सारा ।।**
**माया मंतर जंतर सो त्यागर ।। राख्यो हे नाँव बिचारा ।।३।।**

त्यागी साधुने ओढणे,बिछाणा त्यागला तर मी रामजी सोडून अन्य सर्व देवता,सर्व क्रिया कर्म त्यागले.त्यागी साधुने रथ बैल त्यागले तर मी कपटरुपी रथ बैल त्यागले. त्यागी साधुने गृहस्थी जीवनाचे मंत्र यंत्र त्यागले व मी फक्त एकाच नामाचा विचार ठेवला.।।३।।

**अणभी हुवा भरम सब जाणर ।। मूळ शबद लियो चानी ।।**
**के सुखराम भजन हे साचो ।। ओर भरमना होय कीनी ।।४।।**

त्यागीने माता,पिता,पुत्र,धन कुळाला भ्रम समजून त्यागले.परंतु हे त्यागी भ्रम मिटवणारा मुळ शब्द ओळखू शकले नाहीत.हे त्यागी भ्रमात पडून आवागमनात अटकून गेले.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,साधुने जशी स्थुल माया माता,पिता,पत्नी, धन कुळाला घाबरुन त्यागले आहे.तसे मी पण काळाच्या मुखात टाकणारी मायेपासून भयभीत होऊन काळाच्या मुखात ठेवणाऱ्या मायेला त्यागले व मी भयभीत होऊन काळापासून मुक्त करुन देणारा शब्द शोधला.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सतशब्द प्रगट करणे हेच एक सत्य आहे याच्याशिवाय जे काही त्यागायचे ती माया आहे,हा भ्रम आहे.।।४।।

२८

।। पदराग सोरठ ।।

**बाँभीड़ा खीज कांय दुख पायो**
**हे तो अेक फेर क्रणी कों ।। तां तें बटो लगायो ।।टेर।।**

अरे निच कर्मी तू खिझून का दु:ख प्राप्त करतो.आपण सर्व तर एकच ब्रम्ह आहे.परंतु सर्वांच्या करण्यांचा फेरा आहे.तुम्ही मेलेल्या प्राण्याला खेचतात,त्याची चामडी काढतात, मास खातात,दारु पितात हा बट्टा तुम्हाला लागला आहे.यामुळे तुमची जात निच झाली.।।टेर।।

**लोहो सो अेक जात मे बटो ।। करड़ो कंवळो जोवे ।।**
**पारस लागां अेक सोळ वो ।। दुज्यो छछियो होवे ।।४।।**

लोखंड,लोखंड तर सर्व एकच लोखंड आहे.परंतु त्या लोखंडाच्या जातीमध्ये खुप अंतर आहे.ते त्याच्या कठोरता व नम्रतेवर बघितले जाते.एक चांगले लोखंड पारसला लागून उत्तम सोने बनून जाते आणि दूसरे हलके लोखंड पारसला लागून(ताकासारखे)पांढरे सोने बनते. ।।४।।

**कदळि पडयो कपुर कहाणो ।। अहि मुख बिष होई ।।**
**सीप पड़े सो मोती होवे ।। जात धाम गुण जोई ।।५।।**

वरती आकाशातून पाणी एक सारखेच पडते.त्या पाण्यातून कदलीत पाणी पडते त्याचा कपूर बनून जातो आणि तेच पाणी सापाच्या मुखात पडते त्याचे विष बनून जाते.तेच आकाशाचे पाणी,मोतीच्या शिंपल्यात जाऊन पडते तर त्याचा मोती बनून जातो.याप्रकारे तुमच्या व आमच्या जातीमध्ये आणि राहण्याच्या ठिकाणात गुण वेगवेगळे दिसून येतात. जसे पाणी(शिपल्यात)मुखात पडते त्याचा मोती बनतो आणि सापाच्या मुखात पडले तर विष बनले.याच प्रकारे,तुम्ही भंग्याच्या घरी जन्मले म्हणून भंगी झाले आणि आम्ही ब्राम्हणाच्या घरी जन्म घेतला म्हणून ब्राम्हण झालो.याप्रकारे घर जन्म घेण्याचे गुण वेगवेगळे बघण्यात येतात. ।।५।।

**कबु अेक कसर पड़यांसूं भोपत ।। मेले निरसी जागा ।।**
**यूं सुखराम बांसली कसर ।। नीच जात नर बागा ।।६।।**

केंव्हाही कोणी चूक करतो तर त्याला राजा खराब जागेवर पाठवतात.याच प्रकारे तुमचे पूर्व जन्माचे काही चुक राहील्या कारणाने तुम्ही नीच जातीचे भंगी होऊन गेले.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।६।।

२९

।। पदराग सोरठ ।।

**बाँभीड़ा खीज कांय दुख पायो**
**हे तो अेक फेर क्रणी कों ।। तां तें बटो लगायो ।।टेर।।**

अरे निच कर्मी तू खिझून का दुःख प्राप्त करतो.आपण सर्व तर एकच ब्रम्ह आहे.परंतु सर्वांच्या करण्यांचा फेरा आहे.तुम्ही मेलेल्या प्राण्याला खेचतात,त्याची चामडी काढतात, मास खातात,दारु पितात हा बट्टा तुम्हाला लागला आहे.यामुळे तुमची जात निच झाली.।।टेर।।

**बस्तर सकळ पेड मे सूंती ।। मोल पोत रंग लारे ।।**
**रेंवत अेक मोल सो न्यारे ।। देही जात गुण सारे ।।१।।**

मुळात सर्व कपडे तर सुताने ही बनतात.प्रत्येक कपड्याच्या मोल,पोत,रंग वेगळा राहतो

असेच घोडे दुसऱ्या घोड्यासारखे ही राहतात.परंतु एक घोडा रेसच्या राहतो आणि एक घोडा पांचाळाचा गाडी ओढणारा राहतो.असेच घोड्याच्या देहाची जात,गुणाचे कारण फरक राहतो.या प्रकारे कर्माचे कारण तुमच्यात आणि आमच्यात फरक आहे.असे समजा आणि त्यावर नाराजी नका करु. ।।१।।

**जड़ी सकळ नीर सूं उपजी ।। अेक मास अेक दाडे. ।।**
**अेकण सबही रोग गमाया ।। अेक ऊलट फीर पाड़े ।।२।।**

सर्व जड्या पावसाच्या पाण्याने उत्पन्न होतात.त्या जड्या एकाच महीन्यात,एकाच मातीत लावल्या जातात.त्यांना पाणी ही एकच दिले जाते.परंतु एक अमर जडी राहते. ती मुर्द्याला जिंवत करते आणि एक जडी विषारी राहते,ती जिंवत आहे त्यास मारुन टाकते.असा दोन्ही जड्या मध्ये फरक पड्ला.या प्रकारे तुम्ही व आम्ही करण्यां मुळे उच्च-निच बनले.त्याच्यात खिजता कशाला?पुढे निच जातीत येणार नाही,हे सतज्ञान शोधा. ।।२।।

**बोलण हार जीभ हे अेकी ।। आहिज जीते आ हारे ।।**
**के सुखराम बंधावे रसना ।। आही बिष उतारे ।।३।।**

सर्वाच्या तोंडात बोलण्याची एकच जीभ राहते.या जीभेने जे रामनाम घेतात,ते काळाला जिंकून घेतात आणि जे निच ज्ञान सांगतात,ते काळाशी हरल्या नंतर नर्काच्या दु:खात पड्तात.जो या जीभेने ज्ञान बोलतो,तो अज्ञानाला जिंकून घेतो आणि जो अज्ञानाने बोलतो तो ज्ञानाशी हारला जातो.आदि सत्गुरु सुखरामजी महाराज सांगतात,जीभ एकच आहे परंतु जसे एकच जीभ मंत्र बांधून सर्प,विंचुचा विष चढवून देते.तर तीच जीभ मंत्र बांधून घटात चढलेले सर्प,विंचुचे विषाला उतरवून देते.असे ही सर्वांचा करण्यांच्या फरक आहे. ।।३।।

०४
।। पदराग मंगल ।।

**आन ध्रम दिन च्यार**

**आन ध्रम दिन च्यार ।। उपज खप जाय हे ।।**
**ब्रम्ह भक्त हर भेद ।। अटळ जुग माय हे ।।१।।**

रामजी सोडून अन्य सर्व देवतांचे धर्म जन्मने व मरण्याच्या फेऱ्याचे आहे.ब्रम्हभक्ती (रामजीची भक्ती)जिथे जन्मने-मरणे नाही अशा अटळ पदात पोहचण्याची आहे.पापीहून पापी मनुष्यही आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत हरच्या भक्तीत आला तरीही त्याचा नर्क सुटून जातो हा गुण होतो.।।१।।

**अंत समे लग जोय ।। भक्ति मे आवसी ।।**
**जाँ को ओ गुण होय ।। नर्क नहि जावसी ।।२।।**

काशीच्या महापापी राजाने अंतीम समयाच्या एक वर्षा आधी हरचे स्मरण केले.या एका वर्षाच्या स्मरणाने त्याचा नर्कवास सुटून गेला व परमपदात पोहचून गेला. ।।२।।

**अंत समे मे भुप ।। महा हर गावियो ।।**
**गयो नरक बिष छूट ।। प्रमपद पावियो ।।३।।**

अंतसमयात(एक काशीराज(काशीचा राजा)याने हरनामाचे गायन(किर्तन)केल्याने त्याचा नर्कवास सुटून तो परमपदास गेला.त्याची कथा आहे की एक काशीचा राजा होता.तो मोठा कर्मविलासी व अन्यदेवाची उपासना करणारा होता.त्याच्या कुकर्माच्या योगे, एकशे एक पिढ्यांचे जिवाचा विनाश होवून या राजास अंतसमयी यमाने गळ्यात फासी टाकून या राजाचा प्राण काढला व याचे एकशे एक पिढ्याचे जिवासहीत या राजास नरकात टाकले.या राजाच्या योगाने राजाच्या कुळाच्या लोकास फार त्रास झाला.ते याच्या कुळाचे लोक नरक कुंडात हाहाकार शब्द करीत होते.ते याच्या कुळाचे लोक आपापल्या सुकर्माने कोणी देवाचे लोकात व कोणी विष्णुचे लोकात व कोणी वैकुंठात व कोणी स्वर्गात असे चांगल्या चांगल्या ठिकाणी बसले होते.ते या राजाच्या कुकर्माने एकाएकी नरकात पडल्या कारणाने सर्वही हाहाकार करीत होते.त्यावेळी सप्तऋषी यमपुरीहुन जात असताना यांचा हाहाकार ऐकू आला.तेंव्हा सप्तऋषी म्हणू लागले आज यमपुरीत इतका कल्होळ कशाचा आहे,ते येथे पाहण्यास उतरले असता नरकातील जीवास विचारपुस केली.तेंव्हा ते म्हणाले आम्ही चांगल्या चांगल्या ठिकाणी बसलो होतो.परंतु आमच्या वंशात एक असा दुष्ट उत्पन्न झाला की तो आपल्या कुकर्मामुळे आम्हा सर्वास घेऊन नरकात पडला आहे.तेव्हा सप्तऋषी म्हणाले त्या एकाने कर्म केले आणि तुम्ही सर्व भोगता,तर आम्ही तुम्हास या नरककुंडातून काढवून देवू असे या लोकास आश्वासन देवून सप्तऋषी यमाजवळ (धर्माजवळ)आले आणि धर्मरायास म्हणाले.अरे,धर्मराया तुला न्याय करण्याकरीता येथे ठेवले आहे.तु न्यायी असून असे अन्याय का करतोस?तू तुझ्या मनाप्रमाणे वाटेल तसा न्याय करतोस.कोणी कर्म केले व कोणास भोगवितो असे आम्ही आजपर्यंत ऐकलेही नाही की एका दुष्टाने कर्म केले, त्याचे बद्दल सर्वास नरकात टाकतो.हा न्याय कसा?तेंव्हा धर्मराय भ्याला की हे ऋषी कोडम मुनीसारखे मला शाप देतील,म्हणून तो भिऊन म्हणला मला तुम्ही खोटे जाणत असाल तर नारदऋषीस विचारून घ्या.ही गोष्ट वेदात सांगितली आहे.यांनी नारदास विचारले असता ही गोष्ट वेदात सांगितली आहे असे नारदाने सांगितले तेंव्हा ऋषीस भरवसा आला.तेंव्हा सप्तऋषी नारदास म्हणाले आम्ही त्या लोकास आश्वासन देऊन आलो की तुम्हास नरक कुंडातुन काढवून देऊ.(असे आम्ही त्यांना वचन देऊन आलो आहे)तेंव्हा नारद म्हणाला दुसरा तर काही उपाय दिसत नाही.परंतू हे लोक पाप्यास

वयाच्या(उमरीच्या)एक वर्षापूर्वी घेऊन येत असतात.तर या राजासही एक वर्ष पूर्वी जरूर आणले असेल म्हणून याच्या दप्तरामधून मिसल बोलवा. तेंव्हा मिसल बोलावून हिशोब केला तर त्यास(राजास)एक वर्ष पूर्वी आणले होते.तेंव्हा सप्तऋषी धर्मरायास म्हणाले अरे,लिहिलेल्या श्वासात,एक श्वासही कमी होवू शकत नाही,मग एक वर्ष पूर्वीच यास कसे बोलावून घेतले.तेंव्हा धर्मराय म्हणाला अहो मुनिजन,तुम्ही हा हट्ट सोडा,मी पाप्यास एक वर्ष पहिले आणत असतो व पुण्यवानास एक वर्ष जास्त ठेवत असतो.ही आमची रीत(कायदा)आहे.तेंव्हा ऋषी म्हणाले आम्ही त्या लोकास नरकातुन काढून देऊ असे वचन देऊन आलो आहोत.तर हे आमच्यावर वचनाचे ऋण झाले आहे. तेंव्हा धर्मरायाने गोष्ट कबूल केली व जीव घेऊन जा म्हणून सांगितले)(राजाच्या मागाहून त्याचा वारस गादीवर बसल्याशिवाय प्रेताचे दहन करीत नसतात ही सर्व ठिकाणी रीत आहे.याप्रमाणे राजाचे ही प्रेत कायम होते.)सप्तऋषींनी राजाच्या जिवास सांगितले की तु व तुझे वडील तुझ्या कुकर्माने नरकात पडले हे तू खुद्द डोळ्याने पाहूनही घेतले आहेस.हे जास्त सांगावायास नको.आता आम्ही तुला पुन्हा पाठवितो.तु गेल्यावर तुझ्या दरवाजावर जो संत उभा असेल.त्यास गुरु करुन भक्ति कर तुला एक वर्षा करीता आम्ही परत पाठवित आहोत व इकडे नारदास सप्तऋषींनी सांगितले,तुम्ही याच्या दरवाज्यावर जाऊन उभे राहा व एक वर्षपर्यंत याच्याकडून भक्ति करवा.तेंव्हा हा राजा जिवंत झाल्याबरोबर म्हणाला दरवाजात कोण साधू आहे त्यास आणा.तेंव्हा लोकांनी नारदास आत राजाजवळ आणले.तेंव्हा राजा नारदाचा शिष्य होऊन,नारदाने रामनामाचा जप करण्याचे सांगितल्याप्रमाणे भक्ति करु लागला व आपल्या देशातील प्रजेस कर, सारा वगैरे सर्व माफ करवून सर्वास भक्ति करण्यास लावले.)असा हा अंतसमयी भक्तित आल्या कारणाने त्याचा नरक सुटून गेला व राजा मुक्तिस गेला. ।।३।।

**सात दिवस रट राम ।। परीक्षत हालियो ।।**
**रिष को मेटयो सराप ।। मुक्त मे मालियो ।।४।।**

परीक्षित राजाला ऋषीने सर्पदंश होवून अकाली मृत्युचा श्राप दिला होता.अकाली मृत्युने जीव भूत,पितराच्या महादु:खाच्या योनीत पडतो.परीक्षित राजाने शेवटचे सात दिवस हरचे स्मरण करुन भूत,प्रेतादिक योनी कापून घेतली व सुखाच्या मुक्तीत मिळून गेला. ।।४।।

**दलिपत मोहोरत दोय ।। रटयो हे राम ने ।।**
**गयो हे जलम वो जीत ।। सिधायो धाम ने ।।५।।**

राजा दिलीपच्या मृत्युला दोन मुहूर्त बाकी होते.दिलीप राजाने वशिष्ठ मुनीकडून भेद धारण करुन दोन मुहूर्तात रामनाम घेतले व मानव तनाचा जन्म परमधाम प्राप्त करुन

जिंकून घेतला. ।।५।।

**अजामेळ अंत काळ क ।। दुतां मारियो ।।**
**के सुखदेव हरी नाम ।। लेत सम तारियो ।।६।।**

अजामेळाचा अंतीम समय आला होता.त्याला रामनारायण नावाचा पुत्र होता.अजामेळास यमदूत निच कुकर्मानुसार मारत मारत घेवून जाण्यास आले होते.जेव्हा यमदूत अजामेळास मारु लागले तेव्हा अजामेळाने यमदुतांच्या मारापासून वाचवण्यासाठी आपला पुत्र रामनारायणला राम्या राम्या म्हणून बोलावले.अजामेळाच्या मुखाने राम्या राम्या निघताच यमदुतांनी त्याला सोडून दिले.असा निच कुकर्मी अजामेळाचा राम्या राम्या या नामात रामनाम आल्याने उध्दार होवून गेला.याप्रकारे अंतीम वेळेपर्यंतही कसेही जाणते अजाणते रामनामाचे उच्चारण केले तरीही नर्क सुटून जातो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।६।।

९१

।। पदराग बधावा ।।

## चालोनी रे हंसा

**चालोनी रे हंसा ।। अपणा राम जना के देस ।।**
**वा पद कूं बंछे सदा रे ।। सिव सनकादिक सेंस ।।टेर।।**

आदिपासून दोन देश आहेत.एक रामजनाचा देश,विज्ञान वैरागी संतांचा देश आहे तर दुसरा माया जनांचा म्हणजे मोह ममताच्या होणकाळ देश आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व हंसांना चेतावतात की तुम्ही सर्व आपल्या कोऱ्या सुखाच्या रामजनांच्या देशाला चला. त्या देशाची वंछना शंकर, विष्णु, ब्रम्हा, सनकादिक, शेष इत्यादी सर्व होणकाळाचे लहान मोठे देवता नित्य करतात. ।।टेर।।

**या जग मे थिर कोई नही रे ।। सुख दु:ख बारम बार ।।**
**ब्रम्हा बिसन महेस सारा ।। फिर फिर ले अवतार ।।१।।**

या जगामध्ये सनकादिक,शेष,ब्रम्हा,विष्णु,महादेव हे कोणी ही अमर नाही हे सर्व प्रलयात जातात व प्रलयानंतर वारंवार प्रलयात जाणारा देह धारण करतात असे या सर्वांच्या मागे वारंवार गर्भात येण्याचे व काळापासून मारले जाण्याचे दु:ख लागलेले राहते.।।१।।

**सुर नर सब सांसे पड्यारे ।। जंवरे मॉंड्यो जाळ ।।**
**पीर पैकंबर मुनि जनारे ।। से नही बंच्या काळ ।।२।।**

सर्व देवी देवता,सर्व स्त्री–पुरुष यमाच्या जन्म मरणाच्या जाळ्यातून कसे सुटू या चिंते मध्ये पडलेले आहेत.काळाच्या जन्म मरणाच्या जाळ्यातून चोवीस पीर,एक लाख ऐंशी हजार पैंगबर,अठ्ठयाऐंशी ऋषी मुनी कोणी वाचू शकले नाही. ।।२।।

जामण मरणा जहाँ नही रे ।। जांहाँ नहि सांसा सोग ।।
मोहो माया ब्यापे नही ।। म्हारा संत जना के लोग ।।३।।

माझ्या संत जनांच्या देशात हा जन्म मरण्याचा फेरा नाही म्हणून तेथे काळापासून मुक्त होण्याची चिंता,फिकीर नाही किंवा मेल्यानंतर सोग नाही तेथे काळ आपल्या जाळ्यात फसविल अशी थोडीशी ही येथल्या सारखी मोह ममता नाही.असा माझ्या संत जनांचा कोऱ्या सुखांचा लोक आहे.।।३।।

या घर मे नित नीपजे रे ।। मुक्ता मोती हीर ।।
अनंत हंस केळा करे ।। उण सुख सागर की तीर ।।४।।

संतजनांच्या अमर घरात महासुख देणारे मुक्ता मोती,हिरे,नित्य निपजतात.अशा सुख सागराच्या तिरावर अनंत हंस नेहमी क्रिडा करतात व क्रिडेच्या सुखात मग्न राहतात. ।।४।।

बोहो ताई संत बिराजिया रे ।। अज हुँ बोहोता जात ।।
भै दु:ख कोइ ब्यापे नही ।। म्हारा सतगुराजी रो साथ ।।५।।

तेथे पुष्कळसे संत पोहचलेले आहेत व पुढे ही पुष्कळसे हंस पोहचतील.माझ्या सतगुरुंच्या देशात काळाचे भय व दु:ख घेरत नाही. ।।५।।

केसर बरणा मारगा रे ।। आवे अमर बिवाण ।।
सामा संत बधावसी रे ।। धिन धिन केंता बाण ।।६।।

तेथे जाण्याकरीता केशरच्या वर्णाचा रस्ता आहे.संतांना तेथे घेऊन जाण्याकरीता बावन गादीचे अमर विमान येते.धरतीवरुन तेथे जाणाऱ्या संतांना तेथील सर्व संत समोर येऊन अती प्रेमाने भारी स्वागत करतात संतांनी होणकाळचा देश सोडला म्हणून तेथील सर्व संत खूप खुश होतात म्हणून तेथे पोहचणाऱ्या सर्व संतांची तेथील संत अंतरापासून धन्य,धन्य करतात. ।।६।।

अधर दीप वो झिग:मिगे रे ।। ज्यां मे अमर अे वास ।।
निर्भे संत बिराजिया रे ।। ज्यारो नही हे बिनास ।।७।।

त्या रामजीचा दिप अधर आहे.होणकाळच्या कोणत्याही टेक्याविना आहे तो दिप संत प्रकाशाने झिगमिग चमकून राहिला आहे.तो झिगमिग झिगमिग प्रकाश संतांना खूप आवडतो अशा झिगमिग प्रकाशात संतांचे निवास आहेत.त्या महासुखांच्या निवासात संत विराजतात.ते निर्भय आहे त्यांना काळापासून विनाश होण्याचे थोडेसे ही भय नाही. ।।७।।

सदा सरीसी ओ सत्ता रे ।। अमर संता की देहे ।।
अनंत जुगाँ नहि बीछडे रे ।। नित नित नवला नेहे ।।८।।

त्या अमर संतांच्या देहाची अवस्था नेहमी महासुख घेण्या योग्य राहते.येथील जीवा सारखी सुख घेण्याकरीता अपंग,म्हातारपणासारखी दुबळी अवस्था कधी बनत नाही. तेथे पोहचलेला हंस तेथून वेगळे होऊन होणकाळात कधी येणे चाहत नाही.तेथे नित्य नित्य नवे नवे एकाच्या मागे एक भारीहून भारी सुख राहतात. ।।८।।

**जन निपजे म्रत लोक मे रे ।। जै जै व्हे सुर लोक ।।**

**बटें बधाई उण देस मे ।। कोइ संत पधारे मोख ।।९।।**

मृत्युलोकातून जेव्हा संत मोक्षास जातो.तेव्हा ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,स्वर्ग इत्यादी सर्व देवतांचे लोक संतांची जय जयकार करतात.रामजनाच्या देशाचे संत आपसात मृत्युलोकाचे संत येण्याची शुभ संदेश देतात.आमच्या सारखा हा ही हंस शुरवीरतेने जुलमी काळापासून मुक्त होऊन गेला म्हणून आपसात एकमेकांचे अभिनंदन करतात व तऱ्हे तऱ्हेचे उत्सव करतात. ।।९।।

**बार बार नर देहे नही रे ।। करलो अपणो काज ।।**

**जन सुखिया इण जीव की ।। म्हारा संत जनाने लाज ।।१०।।**

हा नर देह पुन्हा पुन्हा मिळत नाही.हा त्रेचाळीस लक्ष वीस हजार वर्षाचे चौऱ्यांशी लक्ष योनीचे दु:ख भोगल्यानंतर एक वेळा मोठ्या मुश्किलीने मिळतो.यात सतगुरुचा संग मिळेल हे खुप मुश्किल असते म्हणून सर्व हंसांनो तुम्हाला मनुष्य देह मिळाला आहे व सतगुरुचा संग मिळाला आहे म्हणून तुम्ही तुमचे मोक्षास जाण्याचे कारज करुन घ्या. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की अशा काळाच्या जुलूमात फसलेल्या जीवांची संत जनांना दया येते,करुणा येते व सर्व जीवांचा काळ सुटावा ही लाज राहते.जसे रामजीने द्रोपदीचा चीर खुंटायला नको व ती स्त्री म्हणून बेअब्रु होऊ नये ही लाज येत होती म्हणून रामजीने तिचा चिर अखुट करुन दिला होता.कुबुध्द कौरव थकुन गेले परंतु तिचा चिर खुंटला नाही. अशी लाज संतांना जीवांची येते.काळ पचून पचून थकून जातो परंतु सतगुरुच्या शरणात गेलेला जीव रामजनाच्या देशास जातोच जातो.।।१०।।

९९

।। पदराग मंगल ।।

**धर मानव अवतार**

**धर मानव अवतार ।। न गायों राम कूं ।।**

**गया वे जमारो हार ।। चल्या जम धाम कूं ।।१।।**

ज्या ज्या स्त्री पुरुषाने मनुष्य तन धारण करुन रामजीचे गायन केले नाही आणि बळी मागणाऱ्या देवी देवतांच्या भक्ती मध्ये व विषय वासनेमध्ये रमून मनुष्य तन हारुन गेले आहेत त्यांना यम यमाच्या धामास दु:ख भोगवायला घेवून जातात. ।।१।।

अंत समे के लेण ।। भजन नर करत हे ।।
सुख संपत सब छाड़ ।। ध्यान हर धरत हे ।।२।।

पूर्ण आयुष्य रामजीचे भजन करने भुलून गेला व शरीर सुटण्याच्या काही श्वासा आधी सुख संपत्तीला खोटे समजून त्यातून मोह काढून घेतला व तेच प्रेम हरच्या ध्यानात लावून दिले तरीही तो जीव यमद्वारी घेवून जाण्यास सुटून जाईल. ।।२।।

सुणज्यो सब नर नार ।। समो अंत आवसी ।।
सिंव्रण बिन जमदूत ।। पकड़ ले जावसी ।।३।।

प्रत्येक मनुष्याच्या शरीराचा अंत समय येईल व शेवटच्या क्षणापर्यंत ही हरचे स्मरण नाही झाले तर त्या जीवाला यम निश्चित रुपाने यम धामाला पकडून घेवून जातो.हे सर्व जीवांनी ज्ञानाने समजले पाहिजे.।।३।।

छाड़ जक्त की रीत क।। भक्त समाई ये ।।
जम जालंम फिर जाय क।। प्रमपद पाई ये ।।४।।

अंतीम समयी कुटूंब परीवाराने जगाची म्हणजे जीवाला काळ ग्रासण्याची रीत त्यागून हरच्या भक्तीची रीत केली पाहिजे.हर भक्तीची रीत केल्याने जाणाऱ्या जीवाचा यमघाट सुटून जातो व त्याला अनंत महासुखाचे परमपद प्राप्त होवून जाते.।।४।।

चाले कोई जन धाम ।। इसी बिध कीजिये ।।
कर बेकूटी उच्छाव ।। बोळावो दीजिये ।।५।।

जीव अमर धामास पोहचल्यावर जीवाच्या देहाला सुंगधित पाण्याने स्नान करावे, सुशोभीत वस्त्र व दागिने घालावे,रामनाम म्हणत बैठकीत(बैकुठीत)बसवावे व आनंदाने निरोप द्यावा.(अशा प्रकारच्या दागिने,वस्त्र घालून निरोप देण्याच्या विधीला बोळवण देणे म्हणतात.) ।।५।।

कोट कोट फळ होय ।। बेकूटी काड़ियाँ ।।
हंस दुवा दे जाय ।। असुभ राहा छाडियाँ ।।६।।

देहाला तिरडीवर झोपवून न घेवून जाता बैठकीत(बैकुठीत)बसवून घेवून जावे.बैठकीत घेवून जाण्याने बैठकी/बैकुठी काढणारे आई,वडील,पत्नी,पुत्र असे सर्व कुटूंब परीवाराला, नातेवाईकांना व हितचिंतकांना कोटी कोटी सुखांच्या फळांची प्राप्ती होते.मृतकाच्या मागे दु:खाचे अश्रु काढल्याची,रडण्याची विधी त्यागल्याने धामाला गेलेला हंस आनंद मिळवतो व बैठकी(बैकूठी)काढणारे व बैठकीत(बैकुठीत)सहभागी होणाऱ्या सर्व हंसांना जाणारा हंस आशिर्वाद देतो.।।६।।

जे कोई रोवे नाय ।। आँसू नहि नीसरे ।।
के सुखदेव वो जीव ।। बिषे दु:ख बीसरे ।।७।।

ज्या मृतकाच्या कुटूंब परीवाराचे लोक मृतकाच्या मागे अश्रु काढीत नाही,रडत नाही व कोणत्याही प्रमकारचे दु:ख पाळत नाही असा हंस अपूर्ण भक्तीच्या कारणाने सुखाच्या धामाला न पोहचता पुन्हा धरतीवर जन्मला तरीही तो हंस अन्य भक्तीत न जाता रामजीच्या भक्तीतच राहतो व त्याला दु:ख देणारे विषय विकारी कर्मांचा विसर पडून जातो व त्याला विषय विकारी कर्म त्रास देत नाहीत असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री,पुरुषांना समजवून राहिले आहे.।।७।।

१०३

।। पदराग मंगल ।।

धिन्न धिन्न सो हंस भाग

धिन्न धिन्न सो हंस भाग ।। बिषे सब पालीया ।।
म्रत लोक मे आय ।। कारज कर चालीया ।।१।।

ज्या ज्या हंसाने मृत्युलोकात मनुष्य शरीर धारण करुन शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध समान सर्व विषय विकार त्यागले आहे व परमधाम प्राप्त करण्याचे कारज सफळ केले आहे ते सर्व हंस धन्य आहे,धन्य आहे.।।१।।

देव लोक के माँय ।। आनंद सो होत हे ।।
आज बिसन को लोक ।। बाट सो जोत हे ।।२।।

परमधामाला जाण्याच्या वेळेस संताच्या मार्गात देवतांचे लोक लागतात ब्रम्हा,विष्णू, महादेव व इंद्र सहीत सर्व देवतांना संत येण्याचा आनंद होतो.याकरीता विष्णूसहीत सर्व देवता संत येण्याची अती आतुरतेने वाट पाहत असतात. ।।२।।

धिन्न धिन्न हो पुळ आज ।। हंस सो आवसी ।।
म्रत लोक हर गाय ।। बोत सुख लावसी ।।३।।

हे देवता जाणतात की मृत्युलोकातून संत परमधामात जाण्याच्या वेळेस देवतांच्या लोकात पुष्कळसे अनोखे सुख घेवून येतात. ।।३।।

यूँ हर जोवे बाट ।। ग्यान सुण जोईये ।।
जे चावो सुख चेन ।। मति कोई रोईये ।।४।।

व ते सुख भोगून देवतांना अनोखा आनंद मिळतो.अशा सुखाचा भारी दिवस आज आला आहे याकरीता आजचा दिवस धन्य आहे.हे जगाच्या सर्व लोकांनी ज्ञानाने समजले पाहिजे की विष्णूसहीत सर्व देवता संतापासून सूख प्राप्त करण्याची वाट पाहतात मग आमच्या परीवाराच्या हंस सुखात गेला पाहिजे दु:खात नको पडला पाहिजे असे जर खरच सर्वांना वाटत असेल तर सर्वांनी जाणाऱ्या हंसाच्या मागे रडले नाही पाहिजे. ।।४।।

रोयाँ जमका दूत ।। दोड्याँ आवसी ।।

**ध्रमराय के द्वार ।। घेर ले जावसीं ।।५।।**

रडल्याने यमाचे दूत धावून येतील व जीवाला घेरुन धर्मरायाच्या दरबारात घेवून जातील. ।।५।।

**मानो बचन हमार ।। सही कर लीजीयो ।।**
**छाड़ जक्त की रीत ।। भक्त राहा कीजीयो ।।६।।**

हे माझे वचन सत्य आहे यात काही अंतर नाही हे मानून दुःख देणारी जगाची रीत त्यागा व सुख देणारी कैवल्याची रीत धारण करा. ।।६।।

**जुग चालां सूं जोय ।। हंसो दुःख पावसी ।।**
**के सुखदेव सब साध ।। गुन्हो सिर आवसी ।।७।।**

जगाच्या रडण्याच्या रीतीने हंसास दुःख मिळेल व दुःखाची रीत करणाऱ्याच्या शिरावर गुन्हे बांधले जातील असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व साधुंना व स्त्री, पुरुषांना सांगत आहेत. ।।७।।

१०४

।। पदराग मंगल ।।

## धिन धिन सो हंस जीव

**धिन धिन सो हंस जीव ।। मानव तन पाय के ।।**
**साहेब कूं दिन रात ।। गयो नर गाय के ।।१।।**

ज्या हंस जीवा ने मनुष्य देहात येवून सतस्वरुप साहेबाचे गायन केले आहे आणि शरीर सुटल्यावर परमधाम प्राप्त केले आहे तो जीव धन्य आहे,धन्य आहे.।।१।।

**किया सब सुभ काम ।। असुभ सब पालिया ।।**
**सिवऱ्यों सिर्जण हार ।। कारज कर चालिया ।।२।।**

ज्या जीवाने आपल्या मनुष्य देहात साहेबाच्या धामाला पोहचविणारे ज्ञान,ध्यानाचे शुभ काम केले आहे व नरकात पडण्यासारखे पाच विषय वासनात रमण्याचे अशुभ कामाचे त्यागन केले आहे व सिरजनहार साहेबाचे रात्रं-दिवस स्मरण करुन काळापासून मुक्त होण्याचे कार्य केले आहे तो जीव धन्य आहे.।।२।।

**होय उजागर जीव ।। चल्या हे धाम ने ।।**
**धिन्न धिन्न वे नर नार ।। गायो ज्याँ राम ने ।।३।।**

गर्भात रामजी सोबत रामनामाचे स्मरण करुन साहेबाच्या धामात जाण्याचा करार केला होता,त्या करारानुसार रामनामाचे स्मरण केले आहे व साहेबाचा धाम प्राप्त केला आहे असे ज्या-ज्या स्त्री पुरुषाचे उजागर होवून शरीर त्यागले आहे ते सर्व स्त्री,पुरुष धन्य आहे,धन्य आहे.।।३।।

**जब लग जुग मे बास ।। सांई नही बीसरे ।।**

**धिन्न वाँको सुण भाग ।। बेकूटी नीसरे ।।४।।**

जे जे नर–नारी मनुष्य शरीरात जगात जोपर्यंत वास करतात तोपर्यंत पूर्ण वेळेत क्षणभरा साठीही साई विसरत नाही व त्यांचे शरीर सुटल्यानंतर त्यांच्या कुटूंब परीवाराचे लोक त्यांना तिरडीवर झोपवून न नेता बैकुठीत बसवून आनंद उत्सवाचे अग्नीडागाच्या ठिकाणी घेवून जातात असे सर्व स्त्री पुरुषांचे भाग्य धन्य आहे,धन्य आहे.।।४।।

**गरूड बूझियो आय ।। बिसन यूं भाकियो ।।**

**अन्त समे उच्छव ।। आनन्द सत राखियो ।।५।।**

गरुडाने विष्णूला अंतसमयी कशी विधी केली पाहिजे हा प्रश्न विचारला त्यावर विष्णूने गरुडाला अंतीमसमयी मृतकाच्या देहाला बैकुठीत बसवून आनंद उत्सव करत अग्नी डागाच्या ठिकाणी घेवून जायला पाहिजे आणि सतसाईच्या(जो काल ही होता,आजही आहे,उद्याही राहिल अशी कोणती वेळ नव्हती की तो नव्हता व अशी कोणती वेळ राहणार नाही की तो राहणार नाही अशा सतसाईच्या)साक्षीने जाणाऱ्याच्या देहाला अग्नीडाग दिला पाहिजे.।।५।।

**दिन द्वादस जोय ।। हरि जस गावसी ।।**

**क्हे सुखदेव वो जीव ।। सुण्या सुख पावसी ।।६।।**

आणि अशा सतसाईचे बारा दिवसांपर्यंत त्यांच्या घरातल्यांनी शोभा व ज्ञान,ध्यान केले पाहिजे.अशी आनंदाची विधी केल्यावर जाणाऱ्या हंसाला पुष्कळ सुख मिळतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज प्रत्येक स्त्री,पुरुषाला समजावून राहीले आहे. ।।६।।

१६०

।। पदराग मंगल ।।

**जाग जाग धर जाग क**

**जाग जाग धर जाग क ।। सेंस जगाईयो ।।**

**पुत्तर जग मे खेल ।। रम घर आईयो ।।१।।**

अग्नीडागाच्या ठिकाणी पोहोचल्यावर धरती व शेषनागाला प्रार्थना करुन जागृत केले पाहिजे.शेषनागाला ररंकारच्या ध्वनीची गर्जना करण्याची प्रार्थना केली पाहिजे.धरती, आकाश,वायू,अग्नी,जल ने बनलेला आपला पाच तत्वाचा पुत्र जगात रामनामात रमून साईच्या घरी निघाला आहे.।।१।।

**लेज्यो सार संभाळ ।। ग्रभ मती दीजीयो ।।**

**तम प्रगट पाँचू देव ।। सबे सुण लीजियो ।।२।।**

याकरीता आपण सर्व आकाश,वायू,अग्नी,जल व धरती देवता प्रगट होवून या पुत्राला आपला जाणून आणि याचे सर्व अवगुण क्षमा करुन पुन्हा गर्भात न टाकता सांभाळ करा

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

हि विनंती आहे प्रार्थना केली पाहिजे.।।२।।

**ब्रहमंड पवन तेज ।। अप धर मानीयो ।।**
**ओगण इसका छाड़ ।। आपणो जाणियो ।।३।।**

आकाश,वायु,अग्नी,जळ व पृथ्वी(तुम्ही ही गोष्ट)माना.(हे पांच तत्वाने जे शरीर पैदा झाले होते)याचे अवगुण सोडून(तुम्ही तुमच्या पांच तत्वापासून पैदा झालेल्या शरीरास) तुमचाच समजून(तुमच्यात आपला भाग मिळवून घ्या.या देहातील आकाशाचा भाग आकाशाने मिळवून घ्या,वायुचा भाग वायुने मिळवून घ्या,अग्नीचा भाग अग्नीने मिळवून घ्या,जळाचा भाग जळाने मिळवून घ्या व राहिलेला पृथ्वीचा भाग पृथ्वीने आपल्यात मिळवून घ्या)।।३।।

**स्मरथ सामी राम ।। सुणो सत सांईयाँ ।।**
**चेतन हंस संभाळ ।। लेवो हर माईयाँ ।।४।।**

व समर्थ स्वामी राम सत साँई(स्वामी)तुम्हीही ऐका.यातील चैतन्य हंस(जीव जो होता तो)सांभाळून तुमच्यात मिळवून घ्या.(व त्याचा सांभाळ करा) ।।४।।

**सब जीवाँ की राम ।। रछया तुम कीजीयो ।।**
**अगन दाग को दोस ।। हमे मत दीजियो ।।५।।**

अग्नीडागाच्या कारणाने पुष्कळ जीवांना हानी पोहचते.अशी हानी त्यांना न पोहचू देता त्यांची रक्षा करण्याची विनंती व अग्नीडागाचा दोष आम्हाला लागू नये अशी प्रार्थना रामजीला केली पाहिजे.।।५।।

**पाँच तत्त के माँय ।। आप ही आप हो ।।**
**के सुखदेव तुम राम ।। तुमे ही जाप हो ।।६।।**

हे रामजी पाच तत्वात तुम्हीच तुम्ही आहात आणि जिथे पहावे तिथे तुमचाच जाप आहे म्हणजे तुमचीच सत्ता आहे याकरीता रामजी तुम्ही अग्नीडागाचा दोष आम्हाला न देता व जीवाला गर्भात न टाकता सुखाचा देशात मिळवून घ्या हिच प्रार्थना तुम्हाला आम्हा सर्वाची आहे.।।६।।

३४८

।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

**संतो भाई सुणज्यो भेद बिचारा**
**संतो भाई सुणज्यो भेद बिचारा ।। करू न्याव सब सारा ।।टेर।।**

संतो भाई तुम्ही अंतसमयाचे भेद आणि विचार ऐका.म्हणजे अंतसमयी काय केल्याने काय होते याचा भेद आणि विचार मी तुम्हास सांगतो तो ऐका.याचा मी सर्व न्याय करतो ते ऐका. ।।टेर।।

**हरष उछाव बेद धुन होई ।। अरथ उचार सुणावे ।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**अंतकाळ मे आ बिध होई ।। ब्रम्हा का गण आवे ।।१।।**

अंतकाळात वेद धुनाचा बरोबर हर्ष उत्सव मनवतात.वेदाची साखी,श्लोक वाचतात, गातात.असा वेदमय वातावरण बनवतात.या प्रकारे अंतकाळात विधी केली तर त्या हंसाला घेऊन जाण्याकरीता ब्रम्हाचे गण येतात आणि ते गण हंसाला ब्रम्हाचा सतलोक घेऊन जातात.।१।

**हरजस ताळ मरदंग बाजे ।। बटे प्रसाद सवाया ।।**
**अंत समे जो आ बिध होवे ।। लिछमी वर गण धाया ।।२।।**

अंतकाळात विष्णुचे किर्तन करतात,मृदंग,टाळ वाजवतात,प्रसाद वाटतात,असे नवविद्या करतात,तर त्या हंसाला घेऊन जाण्या करीता लक्ष्मीचा पती विष्णुचे गण येतात आणि त्या हंसाला विष्णुचा वैकुंठात घेऊन जातात.।।२।।

**हरक कोड़ सोग नही रंग रागा ।। सिव सिव बचन सुणावे ।।**
**हंसा चले आ बिध होई ।। संकर का गण आवे ।।३।।**

अंतिम समयी ब्रम्हाचा समान आनंद उत्सव नाही किंवा यमाचे समान रड्ने,पिटने इ. दुःख नाही मनवतात किंवा विष्णुचे समान मृदंग,टाळ वाजवून रंग राग नाही करत आणि शिवचा देशाची विधि करतात,सिव सिव वचन ऐकवतात,जेथे ही विधी होईल त्या हंसाला घेऊन जाण्याकरीता शंकराचे गण येतात,ते गण हंसाला शंकराचा कैलासात घेवून जातात.।।३।।

**रोवा पिटो सोग सांसो ।। सोच करे नर नारी ।।**
**हंस बिछुटत आ बिध होवे ।। तो जमराय सुं यारी ।।४।।**

अंतिम समयी हंस सोड्न जाते वेळी स्त्री–पुरुष मरणाऱ्याचा मागे रड्तात,पिट्तात आणि मरणाऱ्याची फिकर करतात.असे असे अनेक विधिने दुःख मनवतात.त्या हंसाला घेऊन जाण्याकरीता यमराज आपला गण यमदुतास पाठ्वतात आणि ते यमदुत हंसाला मारतात, ठोकतात,नाना तऱ्हेचे कष्ट देतात,जुलुम करतात नरकाचे दुःख भोगवण्या करीता यमपुरी घेवून जातात.या प्रकारे हंसाचा यमराजाशी प्रसंग पड्तो. ।।४।।

**जे कोई हंस मोख कुं चाले ।। जां एसी बिध भाया ।।**
**देव डुंडी अनहद बाजा ।। घुरे निसाण सवाया ।।५।।**

परममोक्षात जाणाऱ्या हंसाचा जेंव्हा अंतसमय येतो,तेंव्हा देवतांचा सर्व लोकात मोक्षाला जाणाऱ्या संताचे आगमनाची अनेक प्रकाराने ऐकण्यात कधी नाही येत.अशी विधि,जसे अनहद,मधुर वाजे वाजवून वाजवून,शुभ समाचाराची दंवडी पुऱ्या देवतांचा लोकात देतात. हा शुभ समाचार ऐकून तेथले देवता हर्षित होतात आणि त्या आनंदात आपले पोट ढोला सारखे वाजवतात,तोंडाने मुख एकापेक्षा अधिक असे एक घनघोर सुरीले,

गोड आवाज करतात,सिट्या वाजवतात.अशी विधी स्वर्गादिक लोकात जेंव्हा होते,तेंव्हा समजायचे की,हंसाला घ्यायला परमात्माचा पार्षद बावन गादीचे अमर विमानाचा बरोबर मृत्युलोकात आला आहे आणि हंसाला अमर लोकात घेवून जात आहे. ।।५।।

**जेसी राग भाख जो नाखे ।। सोइ चालवाँ आवे ।।**

**के सुखराम देव सब दाणुं ।। बिध सुणे ऊठ ध्यावे ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,अंतिम समयी जो विधी करतात,जो राग करतात,तसे तसे गण हंसाला घ्यायला येतात.स्वर्गादिकाची विधि कराल,स्वर्गाचे राग गाल,ज्ञान सांगणार,तर स्वर्गाचे गण घ्यायला येतील आणि नरकादिकाची जमराग म्हणजे रडण्याची विधि कराल,चिंता,फिकीर दु:खाची विधि सांगणार तर जमराक्षस उठून हंसाला जमपुरी घ्यायला पळत येतील. ।।६।।

३८१

।। पदराग मंगल ।।

## सुच्च धरणी अप सुच्च

**सुच्च धरणी अप सुच्च ।। तेज ही सुच्च हे ।।**

**जां भेंटयां मळ मेल ।। सबेही मुच्च हे ।।१।।**

कर्तार पवित्र आहे व कर्ताराने बनविलेले सर्व धरती,जल,अग्नी,पवन,आकाश हे पाचही तत्व पवित्र आहे.।।१।।

**सुच्च पवन आकास ।। सुच्च करतार हे ।।**

**हर हर केहे द्यो दाग ।। दोष सब टार हे ।।२।।**

अशा कर्ताराचे स्मरण करुन हर हर म्हणत अग्नीडाग दिल्याने अग्नीडागाचे सर्व दोष मिटून जातात व मृतकाच्या शरीराचे पाचही तत्व धरती,जल,अग्नी,पवन व आकाश तत्वात विलीन होवून जातात,पवित्र होवून जातात. ।।२।।

**धरणी सूं अस्तुत ।। बिणती कीजीये ।।**

**रथी चिणी सिर तोय ।। दोस मति दीजीये ।।३।।**

अग्नीडाग देण्यासाठी धरतीवर रथी(चिता)रचावी लागते व अग्नी लावली जाते याचा जो दोष बनतो तो दोष आम्हाला न लागो ही विनंती धरतीला करावी. ।।३।।

**देव दुग छळ छिद्र ।। दूर सब जावज्यो ।।**

**के सुखदेव तम राम ।। किरपा कर आवज्यो ।।४।।**

जाणाऱ्या हंसाला दु:खात घेरणारे मोगा,पितर समान देवता,राक्षस,छळ,छिद्र इत्यादी सर्वांना अग्नीडागाच्या ठिकाणापासून दूर जायला सांगायचे व सुख देणाऱ्या रामजीला अग्नीडागाच्या ठिकाणी येण्याची विनंती करायची असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।४।।

३८८

।। पदराग मंगल ।।

**सुणज्यो सब नर नार**

**सुणज्यो सब नर नार ।। भजन सो कीजिये ।।**
**हंस चल्यो घर आद ।। बोळावो दीजिये ।।१।।**

हंस देह सोडून महासुखाच्या आदि घरी जातो तेव्हा कुटूंब परीवाराच्या सर्व सदस्यांनी संताच्या शरीराला सुंगधित पाण्याने स्नानादिक करुन सुशोभीत वस्त्र व दागिने घालुन निरोप दिला पाहिजे व रामनामाचे भजन केले पाहिजे.।।१।।

**कर बेकूटी खूब ।। माहे पधराई ये ।।**
**प्रदिखणा प्रणाम ।। हरि जस गाईये ।।२।।**

शरीराला बसविण्यासाठी चांगली बैकुठी सजविली पाहीजे.बैकुठीत शरीराला विराजमान केल्यानंतर जाणाऱ्या संतापेक्षा भक्तीत कमी पोहोचवाल्या हंसांनी नमस्कार केला पाहिजे व प्रदक्षिणा घातली पाहिजे.।।२।।

**अगर चंनण कूं लाय ।। तिलक सो कीजिये ।।**
**केसर आण गुलाल ।। छाँटणा दीजिये ।।३।।**

अगर व चंदनचे संताच्या शरीरास टिळा व छापे लावले पाहिजे व संताच्या शरीरावर केसर व गुलालचे शिंतोडे शिंपडले पाहिजे.।।३।।

**फर्‍याँ चिरांकां जोय ।। बाजा सो बजावणा ।।**
**कर नाटक बोहो भाँत ।। मजल लग जावणा ।।४।।**

गावात तसेच ज्या रस्ताने बैकुठी घेवून जायची आहे त्या रस्ताला पताका,झेंड्या, झिगमिग-झिगमिग करणारे छोटे बल्ब यांनी सजवले पाहिजे व रामधुनच सोबत मधुर वाद्ये वाजत घेवून जायला पाहिजे.।।४।।

**याँ बातां करतार ।। बोत सुख पावसी ।।**
**हँसा के गुण होय ।। तुमे जस आवसी ।।५।।**

अशा प्रकारचे अनेक आनंद देणारे नाटक करत दग्धक्रियाच्या ठिकाणी पोहचले पाहिजे अशा आनंदाच्या गोष्टी केल्याने ज्या कर्तार परमात्म्याने हंसाला मनुष्य देह दिला होता तो कर्तार परमात्मा खूप खुश होतो.त्याच्या खुश होण्याने हंसाला विशेष सुखाचा लाभ होतो व बैकुठी उत्सव करणाऱ्या सर्व स्त्री-पुरुषाला भाग्यात आणलेले नाही अशा अनेक सुखांचा लाभ होतो. ।।५।।

**धिन नर नारी गाँव ।। रोज ज्यां बीसरे ।।**
**धिन नर जाँके हो लार ।। बेकुटी नीसरे ।।६।।**

संताच्या मागे ज्या कुटूंब परीवारात रडणे होत नाही अशा कुटूंबाचे सर्व सदस्य धन्य

आहे, धन्य आहे.तसेच ज्या गावात संताच्या मागे रडणे होत नाही ते गावही धन्य आहे,धन्य आहे.ज्या संताच्या मागाहून बैकूठी निघते तो संत स्त्री असो वा पुरुष धन्य आहे,धन्य आहे. ||६||

**जुग मे बाताँ दोय || असुभ सुभ जाणिये ||**
**के सुख देव आ चाल || असल सत्त ठाणिये ||७||**

जगात शुभ व अशुभ अशा प्रकारच्या अंतसमयीच्या दोन विधी चालतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि ज्या विधीने जाणाऱ्या संताला,त्याच्या कुटूंब परीवाराला, त्याच्या नातेवाईकांना,त्याच्या गाववाल्यांना सुख मिळते ती विधी उंच आहे,सत आहे व अस्सल आहे.तसेच ज्या विधीने जाणाऱ्या हंसाला,त्याच्या कुटूंब परीवाराला,त्याच्या नातेवाईकांना,त्याच्या गाववाल्यांना दुःख पडते ती विधी निच आहे,दुःख देणारी आहे हे समजा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना सांगत आहे.||७||